# माणूस

बुधवार
२७ जानेवारी १९७१
चाळीस पैसे




“ अहो एवढं लांबलचक लेक्चर कसलं देताय् ! मला विचारायचं होतं तुमचा आजचा संध्याकाळचा कार्यक्रम काय आहे म्हणून . . . ”

बुधवार, २७ जानेवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : सहावे दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : छप्पन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार

### शिक्षकाच्या दृष्टीकोनातून

सहा जानेवारी १९७१ च्या अंकात 'इकडे-तिकडे' या सदरात सु. ल. सोमण यांचा 'शिक्षक, विद्यार्थी, नोकरी, ज्ञान वगैरे वगैरे...' या विषयावरचे विचार वाचले. त्यासंबंधीचे हे विवेचन !

'आजचे शिक्षक ज्ञानदानाचे असे विशेष कार्य काय करतात हो ? फक्त नेमून दिलेल्या अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या पाटया टाकतात.' असा त्यांचा दावा आहे. यात प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षकांवर त्यांचा फारसा दावा आहे असे वाटत नाही. यात महत्त्वाची भूमिका येते ती माध्यमिक शिक्षकाची ! निरनिराळया भाषा, गणित, शास्त्र, इतिहास-भूगोल हे निरनिराळे विषय शिकविले (शाळेत) जातात. त्यासाठी त्या त्या विषयातले तज्ज्ञ मी म्हणत नाही, पण ज्ञान असणारे म्हणजे कमीत कमी पदवीधर शिक्षक नेमले जावेत असा सरकारचा, शाळाचालकांचा आणि सर्वांचाच दृष्टीकोन असतो. आणि त्याप्रमाणे ते नेमले जातातही त्या त्या विषयांचा त्यांचा अभ्यास नसतो असे म्हणता येत नाही. आता काही शिक्षकांना शिकविणे ही कला आहे यादृष्टीकोनातून जमत नसेल पण प्रत्येक शिक्षक हा 'उपजत शिक्षक' असतो हे शक्य नाही. म्हणून ट्रेनिंग कोर्सेसतर्फे त्यांना शिकविण्याचे तांत्रिक ज्ञानही दिले जाते. 'अभ्यासक्रम पूर्ण करून घेणे' याबाबत सरकारकडे आणि अधिकाऱ्यांकडे अनेक वेळेला सांगूनही त्यात बदल

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

नाही. सरकारचे शिक्षणक्षेत्रात चाललेल्या प्रयोगांच्या कात्रीत सर्वात जास्त त्रास शिक्षकाला सहन करावा लागला आहे. आज साऱ्या क्षेत्रात आपल्याला काय दिसतं ? वशिला लावून सत्तेसाठी आणि खुर्ची टिकविण्यासाठी झगडणारी माणसे ! कोणत्या क्षेत्रात तुम्हाला प्रांजलपणे काम करणारी माणसं आढळतात ? त्यांचीच मुले या शाळांमध्ये येणार आणि त्यांच्या घरातूनच त्यांना असल्या वागणुकीचं हे बाळकडू मिळालेलं असणार !

सुशिक्षित कुटुंबांमध्येही 'तुझा मास्तर काय शिकवितो' असे उपेक्षेचे सूर लहानपणापासूनच मुलांना ऐकायला मिळतात. मुळापासूनच शिक्षकांविषयी वाटणाऱ्या आदरावर ही कुऱ्हाड टाकली की मुलांच्या मनावर 'शिक्षक' हे नाते कसे बिंबत असेल याचा विचारच केलेला बरा ! पूर्वीच्या काळच्या पालकांचा 'मुलगा तुमच्या हातात सोपवला आहे. त्याला मारा काय वाटेल ते करा, पण तो चांगला शिकला पाहिजे हा दृष्टिकोन होता तर आमच्या मुलाला शिक्षा करणारे तुम्ही कोण ? असे विचारणारा पालकवर्ग आज उदयाला येत आहे. समाजातल्या लोकांनी ही परिस्थिती निर्माण करायची आणि मग कुठूनच मार्ग काढता येत नाही असं दिसलं की शिक्षकाला वाईट ठरवायचं !

सोमणाचं म्हणणं असं आहे, की आजच्या विद्यार्थ्याला 'बाहेरचं' ज्ञान फार मोठ्या प्रमाणात असतं. उदाहरणार्थ 'सिनेमे, सिनेमावाले, नटनट्या इ. इ.' त्यांचं म्हणणं असं आहे का, की, ज्या आमच्या पूर्वजांनी अक्षरवाङ्मय निर्माण केलं, गणित व शास्त्राचे सिद्धांत मांडले, इतिहास रचला, त्याला तिलांजली द्यावी आणि नटनट्यांची माहिती वर्गात शिकवावी ? याबाबतीत त्यांनी विडंबनात्मक वा उपरोधिक लिहिल असेल तर समाजात चालणाऱ्या या 'धंद्या'चा त्यांनी शिक्षकाशी का संबंध जोडावा हे समजत नाही. ते म्हणतात, विद्यार्थ्यांना दगडफेकी, घेराव, मोर्चेबंदी यांची माहिती जास्त असते. पण खरं सांगायचं म्हणजे विद्यार्थ्यांना या साऱ्यातलच ज्ञान अर्धवट असतं. त्यामागची तत्त्वं ते कधीच समजावून घेत नाहीत. पण त्याबाबतीत विद्यार्थ्यांना तरी का दोष द्यावा ? त्यांची विचारसरणी समाजाच्या दूषित विचारसरणीतूनच उद्भवत असते. अशा वेळी त्यांच्या विचारांना योग्य वळण लावण्याचं काम फक्त शिक्षकच हल्ली करीत आहे. त्यांच्या मूलभूत भावनाचं उदात्तीकरण sublimation of instincts फक्त शिक्षकच करू शकतो.

## पंतोजी नव्हे मार्गदर्शक

पूर्वीच्या काळचे पंतोजी मुलांना फक्त Three R's (Reading, writing, Arithmetic) एवढंच शिकवीत. त्यापलीकडे त्यांची जबाबदारी नव्हती. ते विद्वान् नव्हते असं कुणीच म्हणणार नाही. गुरुकुल पद्धतीत विद्यार्थ्यांची संपूर्ण जबाबदारी शिक्षकावर होती हेही मान्य ! पण मध्यंतरीच्या काळात फक्त नेमून दिलेले विषय शिकविण्यापलीकडे त्यांना जास्त काही करावे लागत नसे. चालू २५ वर्षात वा स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा अर्थ कितीतरी बदललेला आहे. मुलाची सर्वांगीण

उन्नती (All sided development of the child) ही भावना निर्माण झाल्या-मुळे विद्यार्थी केंद्र बिंदू समजून शाळांची व्यवस्था पाहिली जात आहे. केव्हाही आजच्या शिक्षकाचा भाग हा पंतोजीचा नसून मार्गदर्शकाचा झालेला आहे. बद-लत्या काळाबरोबर विचारसरणी बदलत जाते. काही गोष्टींमध्ये परिवर्तन होत जातं. त्यामुळे मुलाचा सर्वांगीण विकास साधताना पुस्तकी ज्ञानाबरोबर थोड्या-फार प्रमाणात इतरही गोष्टीचे ज्ञान शिक्षकाला आवश्यक असते. केवळ सरकारने त्यांच्या अंगावर लादलेल्या गोष्टी आहेत म्हणून तो करीत नाही तर स्वतः त्यात आवड निर्माण करून मुलांना शिकवितो. आता शक्तीच्याबाहेर एखादी गोष्ट करावी लागली तर थोडी कुरकूर होणारच. कारण शिक्षकही शेवटी मनुष्यच आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर एका शाळेतील शिक्षक मुख्याध्यापकांकडे आम्हाला सारेच तास घ्यावे लागतात आमचे फ्री तासही जातात, त्यामुळे इतर कामे करणे आम्हाला अशक्य होऊन बसते अशी तक्रार घेऊन गेले. तेव्हा शाळेच्या वेळाच्या अगोदर येत जा नाहीतर शाळा सुटल्यावर थांबत जा असे उत्तर त्याला मिळाले. इतर ऑफिसेसमध्ये ठराविक तास काम केल्यानंतर घरी त्यांना ऑफिसचे काहीही काम नसते. पण वह्यांच्या गठ्ठयांखाली शिक्षक सतत बुडलेला असताना आणि इतरही काही गोष्टी त्याला विद्यार्थ्यांसाठी कराव्या लागत असताना शाळेत त्यांना अगोदर यावे वा नंतर थांबावे या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ? आजचा शिक्षक हा शिक्षक अधिक कारकून आहे. या अंतर्गत अडचणी कधी कोणी लक्षात घेतो का ?

तसेच समाजामध्ये, घेराव, मोर्चेबंदी दगडफेक चालते त्यांत शिक्षकांनी सामील होऊन दगडफेक करावी असं यांना वाटतं का ? आणि असं जर शिक्षक करू लागला तर अडाणी आणि सुशिक्षित यात फरक तो काय राहिला ? साम, दाम, भेद, दंड असे चार प्रकार कोणत्याही गोष्टीच्या निवारणार्थ असतात. तेव्हा शिक्ष-काला कोणतीही गोष्ट विचार करूनच करावी लागते. ड्रायव्हरप्रमाणे अनेक मुलांची 'जोविते' त्यांच्यावर अवलंबून असतात. शिक्षकांनीच शिक्षकांसाठी associations स्थापन केलेली आहेत. ते त्यांचे प्रश्न सोडवतातच. शिक्षकांचे निरनिराळे प्रश्न हाताळण्यासाठी आणि शिक्षकांविरुद्ध आरडाओरडा करणाऱ्या समाज-कंटकांनी त्यांच्यासाठी काय केलं आहे हो ? कारकुनापेक्षाही हलकी जात या स्थानावर आणून बसवण्यातच त्यांना आनंद होतो ना ? एवढेच कशाला आज कारकुनालासुद्धा राहायला ऑफिसतर्फे जागा, वैद्यकीय मदत, बोनस या गोष्टी मिळतात. शिक्षकाला यातलं काय मिळतं ? कधी त्यांची आर्थिक परिस्थिती यांनी बघितली आहे ? अनेक मुलांना मानसिक खाद्य पुरविणाऱ्या शिक्षकांची 'पोटाची भूक भागते की नाही हे पाहिले आहे ? पूर्वीच्या काळी सुबत्ता होती. शिक्षकांच्या घरी विद्यार्थी धान्य आणि इतर वस्तु आणून देत असत. त्यांच्या गरजा चांगल्या-तऱ्हेने भागल्या जाव्यात अशी व्यवस्था विद्यार्थी व त्यांचे पालकच करीत. पोटाचा प्रश्न सुटला की सारी तत्त्वं माणसाला चांगली समजावून सांगता येतात. पण

त्यानंतरचा काळ बदलला आहे. राहणीमान बदललेले आहे. शिक्षकानेही काळा-बरोबर पुढे गेलं तर त्यात काय वाईट आहे ? नवीन पोशाख नवीन विचारसरणी त्यात आली तर त्यात काय वावगं आहे ?

## डरपोक नाही

आजचा शिक्षक डरपोक आहे. सर्वांना घाबरतो असं यांचं म्हणणं आहे. हे विधान करताना त्यांनी कितपत विचार केला आहे ? आज शिक्षक अधिकाऱ्यां-विरुद्ध जरा काही बोलला की त्याला नोटीस देऊन शाळेतून काढून टाकण्यात येते. आर्थिकदृष्ट्या लाचार असलेले शिक्षक मूकपणे सारं सहन करण्याशिवाय दुसरं काय करणार ? पोटाचा प्रश्न आला की सारं तत्त्वज्ञान लटकं पडतं. अशा तऱ्हेने शिक्षकाने अधिकारी व सरकारविरुद्ध योग्य गोष्टींसाठी आवाज उठविल्यावर समाजातील सोमणांसारखी माणसं त्यांना पाठिंबा देतील ?

पूर्वीचे शिक्षक छडी मारायचे म्हणून त्यांच्याबद्दल म्हणे विद्यार्थ्यांना भीतीयुक्त आदर वाटे. भीतीतून निर्माण झालेला हा आदर कितपत आदरणीय आहे ? आणि सर्वांना म्हणजे अभ्यास करून आणणाऱ्यांनाही छडीचा मार उगीचच खावा लागत असे ना ? कारण सारेच विद्यार्थी टरकलेले ! मग त्यांच्यातला एखादाच टिळक निर्माण होई. बाकीचे छडीच खात बसत. आज आपल्यापेक्षा जास्त ज्ञान असलेला व आपल्याला योग्य मार्गावर आणून ठेवणारा शिक्षक मुलांच्या मनात आहे. त्यामुळे आपल्या अडचणीही त्यांना मुले अत्यंत निर्भीडपणे विचारतात. त्यांची ज्ञानाची क्षेत्रेही अधिक व्यापक बनत चाललेली आहेत. वर्गात जाताना शिक्षक घाबरतो असं हे म्हणतात. कदाचित् पहिल्याच वर्षी नुकताच ग्रॅज्युएट होऊन आलेला मनुष्य घाबरत असेल. कारण त्या गोष्टीचा त्याला अनुभव नसतो. पण त्यानंतर त्यांना घाबरण्याचे काय कारण् ? एवढेच ! की शिक्षेचे अर्थ बदलल्या-मुळे ते वाटेल ती शिक्षा मुलांना करीत नाहीत. माझा तर अनुभव असा आहे, की बाहेर विद्यार्थी कसेही वागोत. पण रस्त्यावर वा कुठेही भेटले तरी अदबीने बोलतील, आदर दाखवतील ! अशा मुलांना घाबरण्याचे आम्हाला कारण ? आम्ही त्यांच्या हितासाठी सारं करतो असा आत्मविश्वास असताना ! पूर्वीच्या मास्तरांची भीती वाटे असे हे म्हणतात. मग भीतीयुक्त आदर असणारे हे विद्यार्थी मास्तरांची लफडी शोधत का फिरतात हो ? आजही ! ते म्हणतात मास्तरने ११ वीतल्या एका मुलीशी लग्न केल्यामुळे त्यांना पळून जावं लागलं. त्यांनी त्यात वाईट काय केलं ? मास्तर मनुष्य नाही ? त्याने प्रेम आणि लग्न करू नये ? माझे एक शिक्षक आहेत. त्यांनी तीस वर्षांपूर्वी मास्तर असताना शाळेतल्या एका मुलीशी लग्न केले होते आणि आजही ते त्या गावात सुखाने संसार करीत आहेत. त्या काळीही अशी लग्न होत. मग आजच्याच मास्तरांना दोष देण्याचे कारण काय ? अर्थात ही गोष्ट फार चांगली आहे असं मी म्हणणार नाही पण एखादी अशी केस यशस्वी झाली तर त्यात काहीही वाईट नाही.

२० जानेवारी, १९७१ — उषा देशपांडे, मुंबई

# आमचे जाहीरनामे

## सर्वांस काम

**विष्णुदास बैरागी**, कुरेवाडी

लोकसभेच्या आगामी निवडणुकीने भारतीय राजकारणाला नवा रंग भरत आहे. आज २० वर्षेपर्यंत एका पक्षाने राज्यशासनाची धुरा वाहिली. आजपर्यंतच्या काळात त्यांना जनतेच्या दृष्टीने जेवढे शक्य होते तेवढे त्याने केले. त्यांचा वाटा नाकारणे मतदाराला आज शक्य नाही. परंतु आज मतदार भांबावून गेला आहे. कारण सत्तारूढ पक्षातून बाहेर निघून प्रत्येकाने आपल्या चुली तयार करून राजकारण खेळण्याचा चंग बांधला आणि प्रत्येकजण मतदाराला आपल्यापरीने अन्न तयार करून देण्यासाठी सज्ज झाला आहे. मतदार प्रत्येकाकडे आज २० वर्षे आशेने पाहात आहे. त्याच्या तपाला फळ अजून पूर्ण तयार मिळाले नाही.

आज मतदारांना पाहिजे एक आदेश एक झेंडा. कारण सर्वसामान्य नागरिक त्रस्थ झालेला आहे. त्यांचे मते निवडणूक म्हणजे चार लोकांनी एकत्र येऊन स्वतःचे आणि हितसंबंधीतांचे हितरक्षण करून संघटित अशी लूट करणे; मतदाराने जर दृष्टी टाकली तर त्यास काय दिसत आहे तर मोठे जमिनदार. सहकारी क्षेत्रावर वर्चस्व ठेवून आपले हितसंबंध सुरक्षित ठेवत आहे सामान्य शेतकरी कर्जबाजारी होऊन एक दिवस त्याला भूमिहीन व्हावे लागणार आहे. मध्यम वर्ग आशाळभूत नजरेने सर्वांकडे पाहात आहे. त्यांची कर्तृत्व शक्ती जवळजवळ नष्ट झाली आहे. तेव्हा सामान्य जनता निवडणुकीस विटली आहे. ज्यांना सत्ता पाहिजे ते निवडणूकीमागे लागले आहेत.

सर्व पक्ष पुरोगामी, प्रतिगामी, राष्ट्रीय, अराष्ट्रीय अशी अनेक सोंगे घेऊन मतदारासमोर येणार आहे. परंतु हे सर्व बुरखे आहेत. त्याचे खरे अस्तित्व आहे. परकीय मदत. राजे महाराजांचे पैसे मोठ्या जमीनदारांचे पैसे, कारखानदारांचे पैसे ह्या सर्वांचे पैसे घेऊन त्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी सामान्य मतदाराचा कौल त्यांचे रक्त शोषण्यासाठी मागत आहे. ही आजच्या आगामी लोकसभेच्या निवडणुकीची शोकांतिका म्हणावी लागत आहे. मतदाराच्या मते एखादे काळजी वाहू सरकार निर्माण होईल ही आशा मावळली आहे. लोकशाही ही मेलेल्या जनावरासारखी असून निवडून दिलेले उमेदवार कावळ्यासारखे आपल्या यथाशक्तिप्रमाणे

मांस भक्षण करून उरलेला मतदारांचा सांगाडा टाकून देतात. आजची परिस्थिती एकादा पक्ष किंवा काही पक्ष पुढे येऊन आपले सरकार अस्तित्वात आणून काळजी-वाहू सरकार निर्माण करील ही आशा मावळली आहे. मतदारांच्या मते असे कोणी व्यक्ति किंवा कोणी पक्ष पुढे येऊन एक संघ राज्य निर्माण करावे एक कायदा असावा. सर्वांस काम आणि त्यांच्या कामाचा मोबदला त्याला देण्यात येईल. जन्माने श्रीमंत होण्याचे दिवस घालविले जातील. कसणारास जमीन दिली जाईल. देशाचे सैन्य सर्व आधुनिक शस्त्रांनी सुज्य पाहिजे. हा आजच्या मतदारांचा मानस आहे. □

## श्रीमंत लोकशाही

**रमेश पिंपळे**

आणि एकदाचे एकमेकांवर टीकाप्रहार सुरू होतात, सर्वत्र गडबडीचे वातावरण भरू लागते. तीन चार वर्षे जनतेबद्दल फिकीरी नसलेल्या पुढाऱ्यांना खुर्चीची काळजी पडताच अकस्मात जनतेबद्दल जिव्हाळा निर्माण होतो. आणि ते झोपड-पट्टीत जाऊन अश्रू गाळू लागतात. जनतेसाठी म्हणून नवीन नवीन योजना, वट-हुकूम निघू लागतात. मग त्यावरून त्यांच्यात द्वंद्व निर्माण होतात. जनता गोंधळून जाते, आपल्याबद्दल चाललेले खेळ पाहून उत्सुक होते, तेव्हा समजावे निवडणुका जवळ आल्या आणि आता तसेच एकदाच्या निवडणुका जवळ आल्या आहेत.

लोकात चैतन्य पसरलेले आहे, ते उत्सुकतेने सभेत जाऊ लागले आहेत. सभेत पुढाऱ्यांचे लोकांबद्दल आत्मीयता, जिव्हाळा, दुःख पाहून ते शहरून जातात. नवीन स्वप्ने रंगू लागतात आणि मतदान पेटीत मत टाकण्यास उत्सुक होतात.

पण आजचा युवक निराशवादी आहे. अशा ढोंगास तो फसणार नाही आणि या श्रीमंत लोकशाहीच्या जाळ्यात मुळीच नाही. आता तो मातीतून, रक्तातून निर्माण होणाऱ्या लोकशाहीसाठी तो उत्सुक आहे. दहा जणांनी लादलेल्या या लोकशाहीचा वीट आलाय पण वीट येऊन करणार काय? केवळ धुसफूस! कारण तो सर्व-बाजूंनी बंधनात आहे. कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक तो मनातल्या मनात जळतो आहे पिंजऱ्यातल्या पक्षाप्रमाणे आणि तो पिंजऱ्यातूनच ओरडून समाजाला सांगतोय, मूर्खांनो फसू नका, तुमचे वाटोळे झाले आहे आमचे करू नका. याच पुढाऱ्यांनी देशाचे दोन तुकडे केले आणि हेच आम्हाला सांगताहेत भारतीय संस्कृतीवर प्रेम करा. सिंधच्या खोऱ्यातील संस्कृती आमची आहे पण ती आता कुठे आहे? या सिंधच्या खोऱ्यातूनच भारत जन्मला, या भूमातेचे तुम्हीच तुकडे करून आम्हास शिकविता पण इतिहास कधी खोटा पडू शकतो का? आज सिंध आमचा नाही तो केवळ या सत्तेमुळेच आणि या सत्तेला पोसायचे म्हणता? या लोकांनी २३ वर्षात भारताची काय गत करून टाकली आहे? एक स्वाभीमानी राष्ट्र म्हणून आम्ही

जगतो आहोत ? ही गिधाडे भारतमातेच्या छातीवर बसली आहेत म्हणून हा युवक ओरडत आहे. या निवडणुकीसाठी माझा जाहीरनामा सांगतोय, आता मत द्या पक्ष हे शेवटचे असले पाहिजे, हा खेळ शेवटचाच असला पाहिजे. द्या कोणालाही मत देऊन निवडून आणा नंतर कशी ठोकर बसते पहा, शहाणे व्हा ! या निवडणूका सामान्यांसाठी असत्या तर अनेक चित्रपट सितारे निवडणुकीस उभे राहिलेच नसते. जनसंघाचे नाना देशमुख आय. एस. जोहरकडे पळाले नसते. या निवडणूका केवळ एक फार्स आहे, खेळ आहे. श्रीमंतांचे भले करणाऱ्या या लोकशाहीवर प्रेम करणार ? ही अशी लोकशाही देशाला फारच महाग पडत आहे. नको अशी लोकशाही नकोच ! लोकहो, खऱ्या लोकशाहीच्या शोधासाठी जागे व्हा हेच सांगणे आहे. ⌑

## राष्ट्रवादी व समाजवादी पण—

**कैलास मदान**, बार्शी

स्वातंत्र्योपूर्व काळात अहिंसा, सत्यानी आमचे एक पिढीचे खच्चीकरण केले व स्वातंत्र्योत्तर काळात त्याच्या वारसानी आमच्या पिढीचे खच्चीकरण करण्याचा सपाटा चालविला. पण सावधान. आज वेळ आली की, जेव्हा आपण सरकार बदलू शकतो.

सध्या इंदिरा काँग्रेस-कम्युनिस्ट, प्र. स. प डी. एम्. के. वगैरे दोस्त यांची आघाडी तर, दुसऱ्या बाजूस संघ-काँग्रेस, जनसंघ, स्वतंत्र, सं. स. प. यांची इंदिरा हटावोची तत्वशून्य आघाडी, खरे म्हणजे ह. वि. कामथने म्हटल्याप्रमाणे या निवडणुकीत राष्ट्रवादी समाजवादी पक्ष एकत्र येणे जरूर होते, माझ्यासारख्या म्हणजे एका नव तरुणाला, जो या निवडणुकीत प्रथम मतदान करणार आहे, त्याला काय पाहिजे याचा विचार जरूर व्हावा.

दि. १३।१।७१ च्या माणूसमधील वरुण भिडे यांचा जाहीरनामा आजच्या बेकार तरुणाचे मनोगत समजण्यास पुरेसा आहे. पण अशा परिस्थितीत सुद्धा सर-

पृष्ठ ५३ वर

साप्ताहिक **क्रांतिनाद**
२६ जानेवारी अंक
निवडणूक विशेषांक
प्रसिद्ध झाला.
नागामिझोंच्या स्वातंत्र्यसंग्रामाची चौथी लेखमाला आणि इतर मनाला चटक लावतील अशी सदरे.
७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०.

 Bill No 1035/4-8-71. 

## उज्ज्वल भविष्यासाठीं अचूक उपाय बचत!

आज त्यांना कांहीं काळजीकथा नाहीं. पण उद्यांचें काय ? भविष्याचा
विचार करायला त्यांना शिकवा. भविष्यासाठीं बचत
करायला आणि तीहि स्टेट बँकेत करायला त्यांना शिकवा.

**सेवेसाठी**
**स्टेट बँक**



Aiyars S. 271 MR

# गुजराथचा गड गडगडतो आहे...

दादूमिया

परवा पुण्या-मुंबईत शिवसेना जनसंघाची मारामारी अगदी जवळून पहाण्याचा योग आला. ह्या दुर्दैवाचे मोठे वाईट वाटले. तितकेच इंदिराबाईंच्या हुषारीचे कौतुक वाटले.

मोरारजी खरे बलसाडचे, आजवर त्यांनी हारजीत जी काही अनुभविली ती याच गावी. पण बाईंनी मोरारजींचा सारा मतदारसंघ शिताफीने 'शेड्युल्ड् ट्राईब्ज 'मध्ये टाकून व त्या अस्पृश्यांपैकीच एका प्रमुख पुढाऱ्यासमोर मंत्रीपदाचे गाजर नाचवून मोरारजीभाईंचे पायच कापून टाकले. कारण अशा नवीन परिस्थितीत मोरारजीभाईंना हुकुमी मते किती पडतील हे सांगणे अवघडच आहे.

म्हणून मोरारजीभाईंनी आपला मतदारसंघच बदलून टाकला. सुरत हे मुख्यमंत्री हितेंद्रभाई देसाई यांचे शहर. साहजिकच, हा मतदारसंघ अगदी सुरक्षित असे मोराराजीभाईंनी न वाटले तरच नवल.

पण बाईंनी तेथेही त्यांचा पिच्छा पुरविण्याचे सोडले नाही.

चोखावाला हे सुरतचे नामांकित बनिया. बनियात दोन वर्ग असतात. चोखावाला 'घांची' वर्गातील. यांची सुरतेस प्रचंड लोकसंख्या आहे. हितुभाई किंवा मोरारजीभाई यांना लाख लाख मते जी मिळू शकतात त्यामागे चोखावाला यांची कर्तबगारी आहे हे कोणालाही कबूलच करावे. लागेल. कारण चोखावाला कित्येक वर्षे सुरतेस वकिली करीत आहेत. त्यांची वकिली जोरात चालते. हा प्रतिष्ठित वकील तेवढाच लोकप्रिय आहे. दुसरे कारण त्यांची निःस्वार्थी समाजसेवक ही ख्याती. चोखावाला लाच घेणार नाहीत वा देणार नाहीत अशी सुरतेस कीर्ति आहे तिसरे कारण, बरीच वर्षे ते सुरत शहराचे मेयर म्हणून सतत निवडून येत असतात. चौथे व महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची जात. आपला जातभाई दिल्लीत एक मोठा मंत्री होत आहे, राष्ट्रीय पुढारी बनत आहे या कल्पनेने सुरतेचे मोड वाणी केवढे हुरळून गेले आहेत !

चोखावाला मोठे Calculating वाटतात. त्यांनी इंडिकेटच्या घाग्या या गुजराथ प्रांताच्या प्रतिनिधीस गाठले व त्यांना इंदिरेकडे आपला निरोप घेऊन पाठविले. 'काही चांगली जागा देत असाल तर मी इंडिकेटकडे येण्यास तयार आहे.' एवढा

मोठा मासा गळाला लागतो आहे हे पाहून बाइनी ताबडतोब होकार दिला व चोखावालासाहेब इंडिकेटमध्ये आले.

आणि लक्षात ठेवा, भडोच व सुरत भूकंपाने जेवढे हादरले नसतील एवढे चोखावाला यांच्या ह्या निर्णयाने हादरून गेले !

चोखावाला म्हणजे दक्षिण गुजराथची हुकुमी मते. आज चोखावाला शिक्षण-मंत्री आहेत. उद्या ते निश्चित् एम. पी. होतील व इंदिरा त्यांना मंत्रीमंडळात स्थान देतील.

इंदिरा गांधीनी मोरारजीभाईंना शिवाजीने शाहीस्तेखानाची बोटे कापली त्याची आठवण करून दिली असली पाहिजे. मोराराजींच्या घरीच त्यांचे नाक व पाय कापून टाकण्याचा हा बाईंचा पवित्रा पाहून बाई मोठ्या मिष्कीलही आहेत असे वाटते.

बाईंचा दुसरा पवित्रा म्हणजे मोरारजीभाईंविरुद्ध सतत जिवंत ठेवण्यात येणारी प्रचारयंत्रणा–

मोरारजी तर पूर्वी कलेक्टर होते. कलेक्टर म्हणजे ब्रिटीश राजाचा नोकर. त्यांची मेंटॅलिटी ठरीव होते. सीनियॉरिटीप्रमाणे प्रमोशन मिळाले पाहिजे हे ह्या साहेब लोकांना शिकवून ठेवले होते. मोरारजीस म्हणून तर डेप्युटी प्राईम मिनिस्टर व्हायची घाई झाली होती. कारण अमूक वर्षे झाली की त्यापुढे बढती ही मिळणारच असे त्यांना वाटले. मोरारजींच्या पाठीत लाथ हाणन बाईंनी त्यांना समज दिली की प्रमोशन सीनियॉरीटीप्रमाणे नसते तर मेरीटवर असते.

वरील अर्थाचे विवरण मी आजवर इतक्या जणांकडून ऐकले की त्याचा मला कंटाळा आला. ज्याअर्थी, एवढे लोक हीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगतात त्याअर्थी त्या गोष्टी पसरविण्यामागे कोणाची तरी पद्धतशीर योजना असावी असे वाटू लागते.

'प्रमोशन बाय मेरीट' हे तत्त्व खरे करण्यासाठी मोरारजींची अब्रूची लक्तरे-देखील आज वेशीवर टांगण्यात येत आहेत. त्यासाठी आज अनेक खऱ्याखोट्या गोष्टी प्रसृत करण्यात येऊन मोरारजीभाईंची 'पब्लीक इमेज्' कमी करण्यात येत आहे.

१. मोरारजींचे दारुबंदीप्रेम भारतभर सर्वत्र प्रसिद्ध आहे. मात्र मोरारजी स्वःत रोज दारु पितात, त्याशिवाय का ते एवढे लालबुंद ह्या वयात दिसतात याची चर्चा आज गुजराथच्या रस्त्यारस्त्यावरून होत आहे.

२. दारु आली की बाई पाहिजेच. अत्र्यांनी तर मोरारजींची गुलाबी रेशमी वस्त्रे परिधान करणारी ××× बेगम बाहेर काढली होती. आज लोकांच्या जिभेवर मोरारजींची अनेक खरीखोटी लफडी नाचत आहेत.

३. मोरारजींचा 'कांति बेटा' हा स्मगलर आहे, मधु लिमयेने लोकसभेत

त्याची वाभाडी काढली होती वगैरे whispering campaign जारी करण्यात आली आहे. तो बेटा कांति ६५ रुपायांवर एका इन्शुअरन्स कंपनीत होता व आता त्याचे दहा कोटी रुपये स्वीस् बँकेत आहेत हे कित्येक मंडळींनी जणू तेच त्याचे फायनान्सर असावेत अशा थाटात सांगतात.

४. मोरारजी मग्रूर आहेत. आजवर त्यांनी आपल्या तिखट वाणीने अनेकांना दुखावले आहे. ही दुखावलेली मंडळी शेकड्यांनी प्रत्येक प्रांतात आहेत. ही सारी आज इंडिकेटमध्ये आली आहेत. ही दुखावलेली मंडळी एकटी येत नाहीत. त्यांच्या खिशात पुढाऱ्यांची अंडीपिल्ली असतात. सत्तेमुळे इतके दिवस तो शांत व सोज्वळ वाटली. आज त्यांना पद्धतशीर बोलते करण्यात येत आहे. मी असे पाहिले, मी असे ऐकले असा 'मी' या गोष्टीत शिरला की गोष्टीची विश्वसनीयता खात्रीने वाढते !

५. मोरारची शुद्ध नाहीत, आर्थिक दृष्ट्या भ्रष्ट आहेत हे जनतेस पटवून देण्याचा आज पद्धतशीर प्रयत्न चाललेला आढळतो. गोरका शेठला वाचविण्या. साठी मोरारजीने शेअर बाजारच बंद केला याची आज सर्वत्र चर्चा केली जाते.

६. मोरारजी, निजलिंगप्पा वगैरे मर्द मंडळी 'इंदिरा हटाव' या एक मुद्याच्या कार्यक्रमांत आज मग्न झालेली दिसतात. या सर्व बाप्यांना आज एक बाई का नडत आहे याची चर्चा आज कुत्सितपणे गल्लीबोळात होत आहे.

७. आमच्याकडे लोकसत्ता-जनसत्ता नावाने रमणलाल शेठचे फार प्रचंड खपाचे दैनिक निघते. अहमदाबादेचा हा जणू सकाळ समजा ना. मोरारजी अर्थमंत्री असताना ह्या शेठला बिनव्याजी पंचवीस लाख रुपये मोरारजीभाईंनी दिले होते. त्याची पुढे खूप चर्चा झाली व त्यात मोरारजींचे नाव खूपच खराब झाले. पुढे हे दैनिक इंडियन एक्स्प्रेसवाल्यांनी विकत घेतले. आज हे दैनिक इंदिरेच्या बाजूने संपूर्णपणे नसले तरी थोडा फार प्रचार करते.

८. या प्रश्नने पोळलेले मोरारजी प्रेसवाल्यांवर खूपच उखडलेले दिसतात. ते परवा बडोद्यास आले असताना त्यांनी प्रेसला दर्शन देण्याचेही नाकारले. 'असे कसे चालेल, मोरारजीभाई, प्रेसवाल्यांना दुखवून कसे चालेल आपल्या पक्षाचे ?' असे येथील अध्यक्षांनी मोरारजींना म्हणताच मोरारजी उसळून म्हणाले, 'मला चीड येते या प्रेसवाल्यांची, माझी सारी विधाने ते मुद्दाम Twist करतात.'

'तरीदेखील आपण त्यांना–'

'मला त्यांचे तोंड पहायचे नाही.'

संपले, आता काय बोलणार ?

याने प्रेसवालेदेखील भडकले आहेत.

मोरारजींचा हा अहंकार, इंदिरा गांधी सोडा, भविष्यात प्रेसवालेंच, टाचणी

पृष्ठ ५२ वर

# एक न झालेला समारंभ

रवींद्र पिंगे

दिशा चांगल्या लख्ख उजळल्या. गारवा ओसरला. आगत्याने आलेली माणसं पर्वतीच्या पायथ्याशी कोवळी उन्हं खात गप्पा मारू लागली. कुणी मुंबईहून आले होते; कुणी नाशिक-नगरकडून, तर कुणी सांगली-कोल्हापूरकडून. पंडित अनंतराव कुलकर्ण्यांनी त्या सर्वांना मानपानाने बोलावून घेतलं होतं. "कुलकर्णी ग्रंथागारा"च्या रौप्य महोत्सवातील एका झगझगत्या पर्वाचा सांगता समारंभ मोठा गाजावाजा करून त्यांनी आखला होता. पंडितराव हे मुदलात ललित साहित्याचे आघाडीवरचे प्रकाशक. गेली चोवीस वर्षं ते ललीत प्रकाशनांच्या ऐन धारेत उभे राहिलेले. साहजिकच पंचवीसाव्या वर्षांत नव्या कादंबऱ्यांचा घमघमीत गुच्छ प्रसिद्ध करण्याची अभिनव भव्य योजना त्यांनी आखली. मराठीतल्या मान्यवर् आणि उगवत्या लेखकांना कादबरी लिहून आपल्याकडे प्रकाशनार्थ देण्याची त्यांनी पत्रं पाठवून आणि समक्ष गाठीभेटी घेऊन विनंती केली. अनेकांनी होकार भरला. कुणी तोंडी; कुणी लेखी. प्रत्यक्षात पस्तीस हात लिहिते झाले. पस्तीस कादंबऱ्या तयार झाल्या. त्या सगळया पंचवीसाव्या वर्षात, म्हणजे सत्तर सालांत प्रसिद्ध झाल्या. सौ. मृणालीनी देसाई, मृणालीनी जोशी, लीला श्रीवास्तव शैलजा राजे, चद्रप्रभा जोगळेकर वगैरेंसारख्या सराईत लेखिकांपासून उषा कोल्हटकरां-सारख्या नव्या दमाच्या लेखिकांपर्यंत, आणि श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर, वि. शं. पारगांवकर, अनंत मनोहर, कॅ. बेलवलकर, रमेश मंत्री वगैरे नामवंतांनीही ह्या कादंबरीच्या लेखनसत्रात अहमहमिकेने भाग घेतला. आखलेल्या रस्त्याने झपझप पावलं टाकीत निघालेले पंडितराव इथपर्यंत आले. एका वर्षात पस्तीस कादंबऱ्या प्रसिद्ध करणे हे कर्म अवाढव्यच. पंडितरावांनी ते कौतुकाने तडीला नेले.

त्या कौतुक सोहळ्याचे रंग पाहण्यासाठी सारेजण जमले. पंडितरावांनी दोन दिवसांचा कार्यक्रम मुक्रर केला. शनिवारी सोळा तारखेला साहित्यिकांच्या

गाठीभेटी आणि विश्रब्ध गप्पा. दुपारी पक्वान्नांचं भोजन. संध्याकाळी विनोदी लेखकांवर स्त्रियांची फिर्याद हा लुटूपुटच्या खेळातला बाळ सामंत आणि कंपनीचा मनोरंजक कार्यक्रम. दुसऱ्या दिवशी प्रा. ना. सी. फडके यांच्या घरंदाज अध्यक्षतेखाली गेल्यापंचवीस वर्षातल्या मराठी कादंबरी वाङमयाचा धावता परामर्ष. वक्ते नियुक्त केले होते पुणे विद्यापीठाचे डॉ. भा. दि. फडके आणि मुंबईचे प्रा. व. दि. कुलकर्णी जोडीला ह्या रौप्यमहोत्सवी कादंबरी योजनेतल्या आणि कुलकर्णी ग्रंथागाराच्या आजवरच्या इतर निवडक प्रकाशनाचं प्रदर्शन. ह्या कादंबरी योजनेचं वैशिष्टच असं होतं की सर्व पस्तीत कादंबऱ्यांची रंगीत वेष्टने चित्रकार दलालांनी केली होती. दलालांच्या कुंचल्यातून उतरलेलं वेष्टनांचं मूळ चित्र त्या त्या कादंबरीच्या कर्त्याला प्रकाशकांकडून ह्या समारंभात सप्रेम भेट म्हणून दिलं जाणार होतं. साहाजिकच पंडितरावांनी वर्षो न् वर्ष साथ दिलेल्या चित्रकार दलालांना ह्या सुखसोहोळयाला हजर राहयचं अगत्याचं आमंत्रण स्वत: मुंबईला येऊन दिलं. शिवाय शुक्रवारी पंधरा तारखेला त्यांच्याशी पुण्याहून दूरध्वनीवरून प्रत्यक्ष बोलून पुण्याला अवश्य येण्याची गळ घातली. दलाल कबूल झाले. शनिवारच्या डेक्कन क्वीनचं तिकीट काढून ठेवायला त्यांनी आपल्या स्टुडोयोतल्या सुभाष धामणकरांना सांगितलं आणि विश्रांतीसाठी ते घरी परतले. नेहेमीच्या वेळापेक्षा तासभर अगोदरच एकीकडे त्यांना थोडसं अस्वस्थ वाटायला लागलं होतं. दिशा काळवंडत होत्या.

इकडे पंडितरावांनी सभागृहाच्या भींती दलालांनी वेष्टनासाठी तयार केलेल्या चित्रांच्या मूळ कृतींनी शृंगारण्यास सुरुवात केली. शुक्रवारी रात्री अकरानंतर हे काम सुरू झालं. वेष्टनांची ती रंगपचमी पाहून सर्वांचे डोळे निवले. दलालांच्या आवडत्या ऑलिव्ह ग्रीन रंगाच्या विलोभनीय छटा वेगवेगळ्या शैलीतून प्रकटल्या होत्या. चित्रातले कमनीय स्त्रीदेह म्हणजे प्रमाणबद्ध सौंदर्याचे आकृतीबंधच भासत होते. मंडळी दलालांच्या कुंचल्याच्या ताकदीने प्रभावीत झाली होती. मी त्याच घोळक्यात होतो. एकीकडे दलालांच्या गमती-जमती सांगत होतो; त्यांचा झपाटा वाखाणीत होतो. आम्ही सारेचजण रंगाच्या त्या अलौलिक किमयेवर लुब्ध झालो होतो. त्या तृप्तीतच आमचा डोळा लागला.

दिशा चांगल्या लख्ख उजळल्या. गारवा ओसरला. आमंत्रणातल्या अगत्याने भारावून जमलेले आम्ही पर्वतीच्या पायथ्याशी कोवळी उन्हं खात गप्पा मारू लागलो. मित्रमंडळी जमली म्हणून खुषाल झालो. आण्णा माडगूळकर फीत कापायला येणार होते. ते येतानाही दिसले. आता मिनिटाभरातच कुलकर्णी ग्रंथागाराच्या रौप्यमहोत्सवी सोहोळ्याचा शुभारंभ होणार होता. वातावरण चैतन्याने फुलून आले होते. यजमान दांपत्याच्या चेहऱ्यावरून खुषी ओसंडत होती. प्रकाश पसरत होता.

— आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. प्रकाशलाटा झाकोळल्या. खुषी मावळली. वारा पडावा त्याप्रमाणे हसणंखिदळणं मंद झालं. मालवलं. कुजबूज सुरू झाली. दिव्याच्या माळेतले दिवे एकामागोमाग विझावेत, त्याप्रमाणे सर्वांच्या नजरा थिजत गेल्या. " दलाल गेले म्हणे ! " असं जो तो दुसऱ्याला सांगू लागला. गळे घोगरे झाले. क्षणार्धात डबडबलेल्या डोळ्यांनी पंडितराव सभेला सामोरे आले म्हणाले, ' मित्रांनो, आपले दलाल गेले. म्हणजे आमचं घरातलंच माणूस गेलं. हा रौप्य-महोत्सवाचा सोहोळा मी रद्द करीत आहे. "

कानावर विश्वास न ठेवता आम्ही थरथरत्या पायावर उभं राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली. आवाक् झालेली सभा पांगली. लहान लहान बेटं झाली. हे कसं झालं ? अवघ्या पंधरा तासांपूर्वीच दलालांनी पंडितरावांना आपण येत असल्याचं कळवलं होतं. तिकीटाचीसुद्धा व्यवस्था केली होती. तांब्यांकडे ते वस्तीही करणार होते. त्या सर्वांवरूनच नियतीने बोळा फिरवला होता. जमलेले सारे लेखक-प्रकाशक-संपादकच होते. प्रत्येकाचा असा ना तसा दलालांशी संबंध आलेलाच होता. माझ्या-सारखे काही अगदी निकटच्या वर्तुळातले, चहा-चिवड्याच्या बैठकीतले होते. सर्व कावरेबावरे झाले. काळाचा जबरदस्त हिसका साऱ्यांना जाणवला. वाळूत पाणी जिरावं तसा सर्वांचा आत्मविश्वास कुठच्या कुठे नाहीसा झाला. रंगाचा बेरंग झाला.

पुन्हा नवी घोषणा झाली. फक्त शनिवारचे सगळे कार्यक्रम रद्द झाले. विनोदाचे, करमणुकीचे कार्यक्रम वजा करून रविवारचे वाङ्मयीन स्वरूपाचे कार्यक्रम कायम ठेवण्यात आले. दुभंगलेल्या पंडितरावांच्या मनस्थितीची सर्वांना कल्पना आली. वाईट वाटलं. कुठून हा माणूस निघाला ? कुठे आला ? कसा आला ? निजामी-तल्या तुळजापूर तालुक्यातल्या हिप्परगा गावी अनंतराव कुलकर्णी एक राष्ट्रीय शाळा जिद्दीने चालवीत होते. आपलं सर्वस्वच त्यांनी तिथे वाहिलं होतं. साहित्य-सम्राट तात्यासाहेब केळकर, वि. स. खांडेकर वगैरेंनी भेट देऊन ती शाळा गौर-विली होती. खांडेकरांनी तर त्या शाळेवर ' हिप्परग्याच्या माळरानावर ' हा सुंदर लेखही लिहिला होता. केळकर, खांडेकरांबरोबर त्यावेळी चित्रकार दलालही हिप्परग्याच्या माळरानावर हुरडा खाण्यासाठी गेलेले होते. दलालांनी तिथल्या तिथे तात्यासाहेबांचे एक स्केचही केले ! तरुण दलालांचा आणि हिप्परग्रेकर कुलकर्णी मंडळींचा स्नेह हा असा तीस वर्षांचा जुनापुराणा ! पंडितराव म्हणजे ह्या अनंतरावाचे चिरंजीव. शिक्षणासाठी ते पुण्यास आले. रा. ज. देशमुख आणि मंडळीच्या रा. ज. देशमुखांकडेच ते नातेसंबंधांमुळे राहिले. प्रकाशनाचे पहिले धडे यांनी तिथेच गिरवले आणि एस. पी. महाविद्यालयात असतानाच त्यांनी वि. वि. बोकील यांचा ' अमृतकण ' हा कथासंग्रह सेहेचाळीस साली स्वतंत्रपणे प्रकाशीत केला. लातूरच्या भगवानराव कुलकर्णी वकिलांबरोबर त्यांची प्रारंभी भागिदारी होती. पुढे ते स्वतंत्र व्यवसाय करू लागले. ह्या गोष्टीला आता पंचवीस वर्षं होऊन

गेली. पंडितरावांनी ह्या पावशतकाच्या काळात, दरम्यानच्या काळात पानशेतच्या प्रलयाने मारलेली ठोकर गृहीत धरूनही, सुमारे साडेतीनशे ललित पुस्तके प्रकाशीत केली. फडके, बोकील, दत्त रघुनाथ कवठेकर, थोरले माडगूळकर, असे खपाऊ लेखक त्यांनी मिळविले आणि संतुष्ट राखले हे अधिक महत्त्वाचं. फक्त ललित पुस्तकेच तेवढी प्रसिद्ध करणारे ते ह. वि. मोटयांच्या रांगेतले प्रकाशक आहेत. सौ. सुमतीबाईंचे त्यांना सहकार्यही लाभले आहे. तेव्हा अशी वाटचाल करणाऱ्या पंडितरावांचे रौप्यमहोत्सवी पर्वातले निदान काही कार्यक्रम तरी दुसऱ्या दिवशी होणार याचे आम्हाला बरे वाटले.

रवीवारचा दुसरा दिवस उजाडला. रमेश मंत्रींच्या नेपथ्याखाली लेखकांचा परस्पर परिचय आणि प्रत्येकाचे एका मिनिटाचे विनोदी भाषण हा कार्यक्रम आटपला. मिनिटभर का होईना, पण विनोदी किंवा मनोरंजक बोलणं खडक तासण्याइतकं बिकट आहे. ह्याची बहुसंख्य लेखक-लेखिकांना जाणीव ह्या कार्यक्रमाने जरूर करून दिली असणार! संध्याकाळी प्रा. ना. सी. फडक्यांच्या अध्यक्षतेखाली कादंबरी वाङ्मयासंबंधी झालेली चर्चा अपुरी आणि शेरेबाजीने भरलेली वाटली. प्रा. भालचंद्र फडके ताशीव आणि ठोस बोलले. पण कुठल्याही लेखकाचे मूल्यमापन खोलात जाऊन ते करू शकले नाहीत. प्रा. व. दि. कुळकर्णींना तर अखेरीस आपले भाषण वेळेच्या अभावी जलदगतीने गुंडाळावे लागले. नव्या कादंबरीकारांमध्ये श्री. ज. जोशींच्या 'आनंदी गोपाळ'चा त्यांनी उल्लेखही केला नाही, हे सर्वांनाच खटकले. मात्र त्यांनी विषय छान मांडला होता, हे कबूल केलेच पाहिजे. प्रा. ना. सी. फडक्यांचे भाषण त्यांच्या आजवरच्या कीर्तीला अजिबात शोभले नाही. श्री. ना. पेंडशांचा साधा उल्लेखही त्यांनी केला नाही! खरं म्हणजे ते फारच भरकटले. आपण लेखकांसमोर बोलत आहोत ह्याचे त्यांचे भानही पार सुटले होते. जशी म्हाताऱ्या बालगंधर्वांना त्यांच्या शेवटच्या दिवसातल्या भकास गाण्याबद्दल रसिकांनी क्षमा केली होती, काहीशी तशीच भावना वयोवृद्ध आप्पासाहेबांचे हे भाषण ऐकताना, आणि कंटाळल्यानंतर ते कानाआड करताना कृतज्ञ श्रोत्यांच्या मनात परत परत उमटत होती. कालाय तस्मै नम:

खुद्द पंडितरावांनी, त्यांच्या साऱ्या हसतमुख आणि सेवाशील कुटुंबियांनी, आणि समारंभासाठी जमलेल्या सर्वांनी आनंदी राहाण्याची, वातावरण उल्हसीत ठेवण्याची आपल्याकडून शिकस्त केली. पण सर्वांच्याच हृदयात स्थान मिळवलेल्या चित्रकार दलालांनी आपल्या आकस्मिक निधनाने सर्वांना जे गांगरून टाकले ते टाकलेच! आम्ही दोन दिवस समारंभाला होतो. पण खरं सांगायचं तर समारंभ मुळी झालाच नाही. ते फूल उमलायच्या अगोदरच कोमेजून गेले होते!

□ □ □

# भारताच्या राजकीय परिवर्तनाचा वादळी कालखंड

— मल्लीनाथ

भारतीय राजकारणाचा १९६७–७० चा कालखंड हा राजकीय परिवर्तनाचा वादळी कालखंड आहे. या कालखंडात एकपक्षीय लोकशाही भंगली व त्यानंतर जो पक्ष भारताला स्थिर शासन देत होता तोच दुभंगला. काँग्रेस ही समावेशक आघाडी होती. तिचे नेतृत्व उदारमतवादी होते. त्यात डावा किंवा उजवा कडवेपणा नव्हता. नेहरू त्याचे प्रतिनिधी होते. त्यामुळे १९४७ मध्ये काँग्रेसचे वैचारिक विभाजन न होता ते सत्तायंत्र बनले व नेहरू त्या सत्तायंत्रावर हुकुमत गाजविणारे राष्ट्रपुरुष ठरले. त्यांच्या कृपाछत्राखाली अनेक दुष्कृत्ये लपविली गेली. अनेक दुष्कर्मे करणारे राजकारणी पुरुष आपली लूट करीत राहिले. नेहरूंपुढे भारत भाग्यविधाता व विश्वपुरुष अशी स्वतःच्या दोन प्रतिमा होत्या. त्या आयुष्यभर त्यांनी जपल्या. तीच प्रतिमा इतिहासावर ठसविली जावी असा प्रयत्न त्यांनी केला. याच वेळी काँग्रेसच्या या आघाडीत सामील होऊन वर्गहिताचा स्वार्थ साधणारे गट, जातिवादी गट आदी विविध हितसंबंधी गट आपला स्वार्थ साधत होते. १९६७ साली जनतेने या सर्वांना पहिला तडाखा दिला आणि काँग्रेसचे सार्वभौमत्व संपुष्टात आणले.

## सध्याचे विविध पेचप्रसंग

गेल्या वीस वर्षांतील विविध राजकीय, आर्थिक, सामाजिक घटनांमुळे, आपल्या राज्यघटनेमुळे, नियोजनामुळे या देशात विविध प्रकारचे पेचप्रसंग एकाच वेळी उद्‌भवले आहेत. त्याचे थोडक्यात स्वरूपात प्रथम पाहिले पाहिजे. एक तर सर्वांना समान आर्थिक, राजकीय, सामाजिक अधिकार देऊन व त्यासाठी राजसत्ता निर्माण

करणारे सत्तायंत्र जनतेच्या हाती सोपवून भारतात फार मोठी अदृश्य क्रांती आपण केली आहे. या क्रांतीचे स्वरूप जोपर्यंत पुस्तकी होते, तोपर्यंत राजकीय शांतता लाभली. पण या समान हक्कांनी जागरुक झालेली जनता जेव्हा अस्वस्थ होऊ लागली तेव्हा अनेक तणाव निर्माण झाले. उदाहरणार्थ शहरीकरणामुळे नवा मध्यमवर्ग निर्माण झाला. त्याची राजकीय निष्ठा काँग्रेसकडेच होती असे म्हणता येणार नाही. किंबहुना आज मद्रास, कलकत्ता, मुंबई, दिल्ली या प्रमुख शहरांत सत्तारूढ काँग्रेसला मुळीच स्थान नाही. याच शहरांभोवती वाढलेली खेडी किंवा नव्या औद्योगिक वस्त्या येथेही राजकीय जागृती झाली आणि ती काँग्रेसच्या प्रभावकक्षेबाहेर गेली. दुसरा वर्ग हरिजनांचा व गिरीजनांचा. हा वर्ग असंघटित आहे. पण त्यांची राजकीय निष्ठा काँग्रेसकडे नाही. त्यातील काही व्यक्ती आपापले गट करून त्यांना राजकीयदृष्टया संघटित करीत आहेत. पण स्वतंत्र व राखीव जागामुळे त्यांचा वर्ग राजकीयदृष्टया प्रभावी आहे. लोकसभेत त्यांना ५२२ पैकी ११० च्या आसपास जागा आहेत. तिसरा वर्ग नव्या तरुण मतदारांचा. याची संख्या ९।। कोटी आहे. एकूण मतदारांची संख्या २८ कोटी आहे. हा सगळा वर्ग २०-२५ या वयोगटातला आहे. त्याच्या राजकीय निष्ठा काँग्रेसला अनुकूल असतीलच असे नाही. कोठे त्या शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षाकडे किंवा कोठे अकाली, डी. एम्. के. यासारख्या जातिवादी पक्षाकडे आहेत, कोठे तो कम्युनिस्ट आहे तर कोठे जनसंघाकडे आहे. आणखी एक वर्ग म्हणजे लहान शेतकरी व शेतमजूर यांचा. त्यातले ७० टक्के लोक अत्यंत हलाखीच्या स्थितीत आहेत. त्यातही हरिजन बहुसंख्य आहेत. तेव्हा त्यांचा प्रश्न सामाजिक व आर्थिक उपेक्षेचा आहे. हा वर्ग असंघटीत आहे. त्याचे राजकीय नेतृत्व कोणाकडेच नाही. पण तेथे हरित क्रांतीमुळे अस्वस्थता आहे. ही अस्वस्थता राजकीय नेतृत्व मिळाले तर स्फोटक ठरेल. आणखी एक तणाव मुसलमानांचा आहे. गेल्या तीन वर्षांत-विशेषतः काँग्रेसच्या पराभवानंतर व नेहरूंच्या निधनानंतर हा वर्ग पोरका झाला आहे असे त्यांना वाटते. त्यातील राजकीय आकांक्षा असणारे मध्यमवर्गीय पुढारी आता जातिवादी व अलगपणाचे राजकारण पुन्हा सुरू करून त्या वर्गाला हिंदूंपासून वेगळे करू पहात आहेत. फाळणीमुळे हिंदूंच्या मनात मुसलमानांविषयी जो राग आहे तो दबला आहे. त्याला जर आणखी खतपाणी कोणी घातले तर मुसलमानांचं भयानक नुकसान होईल.

## वर्गसंघर्ष नाही

या २० वर्षांत सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असूनही तीव्र वर्गसघर्ष झाला नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. तेलंगण, नक्षलवादी असे काही अपवाद सोडले तर जे संप झाले ते वेतनवाढीसाठी होते. वर्गसंबंध बदलावे, मूलभूत आर्थिक क्रांती व्हावी अशी तळमळ आजच्या कामगाराला नाही. त्यामुळे कामगारांची क्रांतिकारी शक्ती

कधीच प्रत्ययास आली नाही. सार्वजनिक उद्योगक्षेत्रात किंवा सरकारी नोकरात जो असंतोष आहे त्याचे स्वरूप वर्गसंघर्षाचे, समाजवादी नाही. उलट देशाच्या आर्थिक कुवतीशी विसंगत अशी वेतनश्रेणी भारत सरकारने मान्य करावी व संघटनेचे दडपण आणून आपला स्वार्थ साधावा एवढाच या कामगार संघटनांचा कार्यभाग आहे. आज जे तणाव या क्षेत्रात दिसतात ती क्रांतिकारी शक्ती नसून वेतनविषयक असमाधान व महागाईमुळे आलेली चीड आहे. पण राष्ट्रीय मिळकतीचा, उत्पादनाचा विचार न करता जेव्हा वेतनश्रेणी, मजूर कायदे निश्चित् केले जातात तेव्हा याखेरीज दुसरे काहीच होऊ शकत नाही.

सारांश, शहरीकरण, उद्योगीकरण, हरितक्रांती, मुसलमानांचे धोरण, प्रादेशिक प्रश्न, नवा तरुण मतदारांचा वर्ग यामुळे वेगवेगळे तणाव आपल्या देशात सध्या दिसत आहेत. या सर्वांत महत्त्वाचा एक पेचप्रसंग म्हणजे राजकीय पक्षांतील पेचप्रसंग आहे. त्याच्याशीच निगडीत असा राजकीय चारित्र्याचा पेचप्रसंग आहे.

## राजकीय पक्षपद्धती

गेल्या चार वर्षांत भारतातील राजकीय पक्षपद्धती कोसळली आहे. एक तर जनसंघ व कम्युनिस्ट या पक्षांनाच खरे विरोधी पक्ष म्हणता येईल. बाकीचे सर्व पक्ष काँग्रेसमधून या ना त्या कारणाने फुटून निघालेले गट होते. समाजवादी चळवळही एकाच पक्षाच्या व्यासपीठावर संघटित होऊ शकली नाही. आता तर प्रत्येक पक्षाचे दोन किंवा तीन तुकडे झाले आहेत. दुसरे असे, जनसंघ ही काही 'मास-पार्टी' नाही; तो एक शिस्तबद्ध वर्धिष्णु व कार्यकर्त्यांची मोठी संख्या असलेला पक्ष आहे. त्याचा जनतासंपर्क नुकताच सुरू झाला आहे. कम्युनिस्ट पक्षातही तीन पक्ष झाल्याने त्याचा जनतासंपर्क हा एकमुखी नाही. निवडणुकीचे राजकारण व अधूनमधून संप एवढाच त्याचा कार्यक्रम आहे. तीच परिस्थिती दोन्ही समाजवादी पक्षांची. स्वतंत्र पक्ष जनतासंपर्काबद्दल कधीच प्रसिद्ध नव्हता. काँग्रेस हा तर सत्तारूढ पक्ष. त्यामुळे सत्तेचे राजकारण, सत्ता हाती आली की त्यापासून वैयक्तिक, जातीय व पक्षीय फायदा करून घेणे हा त्यांचा धंदा. राजसत्तेच्या बळावर त्यांनी अनेक सत्ताकेंद्रे निर्माण केली व ती ताब्यात ठेवली. तेव्हा सर्व राजकीय पक्षांनी आता लोककारण सोडून दिले असून सत्ताकारण अंगिकारले आहे. राजसत्तेचा वापर जनसेवेसाठी करावयाचा असे नसून लूट करण्यासाठी ती राबवावयाची हे त्यांचे मुख्य सूत्र. जनकल्याणासाठी योजना काढताना त्यात स्वतःचे खिसे कसे भरता येतील हीच मुख्य विवंचना असते. गेल्या वीस वर्षांतील विकासयोजनांचे पृथक्करण केले तर त्याची तीन-चार उद्दिष्टे दिसतात. एक : दलालांचा जो वर्ग आपल्या देशात होता त्यांच्यासाठी परमिटे-परवाने यांची पद्धती निर्माण करून काँग्रेसने व त्यांतील अनेक व्यक्तींनी स्वतःचा फायदा करून घेतला. सर्व राजकीय पैसा (Political Finance) या वर्गाकडून येत होता. गेल्या वीस वर्षांत जी उद्योगकुले

निर्माण झाली त्यामागे काँग्रेसचीच अर्थनीती आहे हे विसरू नये. दुसरा वर्ग श्रीमंत शेतकऱ्यांचा. त्यासाठी सरकारी खर्चाने पाटपाण्याच्या, सहकारी बँकांतील कर्जाच्या अनेक योजना काढण्यात आल्या. जिल्हा परिषदा निर्माण करून सार्वत्रिक लुटीचे विकेंद्रीकरण करण्यात आले. ही सगळी शक्तिकेंद्र जात, पक्ष आदींच्या सहाय्याने काँग्रेसने आपल्या ताब्यात ठेवली. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, राजस्थान, आंध्र, आदी अनेक राज्यांतील सरकारे या श्रीमंत शेतकरी, मध्यम प्रतीचा उद्योगपती यांच्या दबावाने चालतात आणि केंद्र सरकारवर मोठ्या उद्योगकुलांचे वर्चस्व असते. हे सगळे १९६७ पर्यंत चालू होते. आताही तसेच चालू आहे.

## राजकीय लांचबाजीचे मूळ

या दोन वर्गांनी राजसत्तेवर आपली पकड बसविल्यामुळे नोकरशाहीही त्यांतून सुटली नाही. दिल्लीतील विविध उद्योगकुलांचे संपर्काधिकारी नोकरशाहीला नाना प्रकारची लाच देऊन आपली कामे करून घेतात हा अनुभव आता नित्याचा आहे. दत्त कमिशन किंवा बिर्ला चौकशी कमिशन यांचे खरे अहवाल व साक्षी बाहेर आल्या तर नोकरशाही कशी भ्रष्ट झाली आहे हे समजेल. पण ही भ्रष्टाचाराची क्षेत्रे मंत्री व नोकरशहा यांनी आपआपसात वाटून घेतली असल्याने आता नोकरशाहीवर जरब कोणाची राहाणार ?

नोकरशाहाकडून अनेक बदकर्मे करून घेतली गेली आहेत, त्यामुळे लाचलुचपत व भ्रष्टाचार यांच्याविरुद्ध आवाज उठविण्याचा नैतिक अधिकारच राज्यकर्त्यांना राहिला नाही. शासन सुधारणा करणेच त्यामुळे अशक्य झाले.

पण अर्थात हे सर्व घडत असताना एवढी मोठी रक्कम खर्च केल्यानंतर, त्याचे काही अनुषंगिक फायदे देशाला मिळालेच यांत शंका नाही. पण या देशाचे जे औद्योगिक उत्पादन वाढले ते खाजगी उद्योग क्षेत्रात आणि खर्चाचा बोजा व तोटा वाढला तो मात्र सरकारी उद्योगक्षेत्रात ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्रीय मिळकत, राष्ट्रीय उत्पन्न यांच्याशी प्रमाणबद्ध नसलेले वेतन धोरण पत्करण्यामुळे हे घडले. वस्तूंच्या किंमती वाढत गेल्या व उपयुक्त वस्तूंचा पुरवठा कमी होऊ लागला.

अर्थात शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे हे खरे असले तरी मुलांना जीवनोपयोगी शिक्षण मिळत नसल्याने सुशिक्षितातील बेकारी वाढली. कलकत्त्याच्या जादोपूर विद्यापीठाच्या उपकुलगुरुंचा खून ही या केवळ पुस्तकी शिक्षण देणाऱ्या पद्धतीतून घडलेली शोकांतिका आहे. तंत्रज्ञांच्या शिक्षणाच्या सोयी वाढल्या, पण पुरेसा औद्योगिक विकास झाला नाही. म्हणून तंत्रज्ञांची बेकारी आली. मनुष्यशक्तीचे नियोजन हा या देशाचा महत्त्वाचा प्रश्न आहे. तोच कोणी सोडवीत नाही. तसेच आरोग्यमान वाढले, पण लोकसंख्येला पुरेसा आळा बसला नाही. त्यामुळे लोकसंख्येचे दडपण वाढले. हे सगळे तणाव आपल्या चुकीच्या, वेंधळ्या व मतलबी नियोजनातून निर्माण झाले.

यात वैयक्तिक खुळे होतीच. खादी ग्रामोद्योग कमिशन, सामूहिक विचास योजना ही त्याची दोन मूर्तिमंत उदाहरणे. हे सगळे चालू ठेवण्यांत आले याचे कारण काँग्रेसला सर्वांची सोय लावायची होती. राजकीय सोय हे या लाचबाजीचे व अपखर्चाचे मुख्य कारण आहे. ही उधळपट्टी जनतेच्या पैशावर करण्यात आली. त्या सर्वांचा ताण आपल्या तिजोरीवर आता पडतो आहे. नियोजनेतर खर्च इतक्या प्रमाणात वाढला आहे की त्याची व शासकीय खर्चाची तरतूद करण्यासाठी आपला निम्मा अर्थसंकल्प खर्ची पडतो.

## हे दुष्टचक्र

हे दुष्टचक्र सुरु होण्याचे मूळ कारण काँग्रेसचे राजकारण व त्यातील सत्ताधाजांच्या कारवाया हे आहे. याच काळात परदेशी मदतीचा खुराक चालू होता. प्रथम अमेरिका, राष्ट्रकुल व नंतर कम्युनिस्ट राष्ट्रे या सर्वांकडून आपण इतके कर्ज घेऊन ठेवले आहे की १९६७ नंतर भारतातील राजकीय अस्थिरतेमुळे आता परदेशी सरकारे आपल्या चलनावर व आपल्या शब्दावर विश्वास ठेवीनाशी झाली आहेत. जगातला प्रत्येक देश आता आपल्याला फार तुसडेपणाने वागवीत आहे ही वस्तुस्थिती आहे. जो रशिया साम्यवादी आहे म्हणून आपल्याला त्याच्या समाजवादी निष्ठेबद्दल प्रेम आहे तो ही पक्का माल आपल्याकडून घेऊन त्याऐवजी यंत्रे देत आहे. त्याचाही आर्थिक साम्राज्यवाद आपल्याला लुटू पहात आहे.

सारांश भारतातील राजकीय जीवनात आज जे काही घडत आहे, जी आर्थिक दिवाळखोरी आल्यासारखे वाटत आहे याचे मुख्य कारण शासन विस्कळीत झाले आहे. त्यातील प्रत्येक खात्याला स्वतःचे धोरण असले तरी सर्व देशाची गरज पाहून तो ते धोरण बदलू इच्छित नाही. मक्तेदारीची व साम्राज्यउभारण्याचीच प्रत्येक मंत्र्याची इच्छा असते आणि या सत्कार्यास नोकरशहा मदत करतात. म्हणून कोणताही मूलगामी बदल होऊ शकत नाही.

## प्रशासनाचा खर्च

नोकरशाही जुनाट आहे. तिच्यातही तज्ञांपेक्षा सर्वगामी आय्. सी. एस्. आय्. ए. एस्. आदी अधिकाऱ्यांचे वर्चस्व आहे. तंत्रज्ञ विरुद्ध सर्वगामी प्रशासक असा छुपा संघर्ष चालू आहे. राजकीय पुढाऱ्याला दोघांचीही गरज असते. म्हणून तो कोणालाच दुखवीत नाही. तंत्रज्ञांची व विशेषज्ञांची कुचंबणा होते. त्यामुळे ते खाजगी उद्योगक्षेत्राकडे धावतात. वशिलेबाजीमुळे शासनही ढिले व अडाणी झाले आहे. तेथे निर्णयक्षमता उरलेली आही. मंत्र्यांचे दडपण, हस्तक्षेप हा प्रकार चालूच असतो. त्यामुळे तेथेही उदासीनता आहे. नेहरूंनी तर सर्व नियोजनाची अंमलबजावणी नोकरशहांवर सोपविल्यामुळे पार्किन्सनच्या सिद्धांताप्रमाणे त्यांनी आपले महत्त्व वाढविण्यासाठी प्रशासन फुगवून ठेवले आहे. आताचा नवा विनोद म्हणजे प्रशासन सुधारणा कमिशन नेमून सरकारने अहवाल तयार करून घेतले आणि

त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासन सुधारणा खाते नावाचे नवे खाते निर्माण करण्यात आले. एवढीच त्या सर्व प्रयत्नांची निष्पत्ती.

सारांश, भारताची सद्य:स्थिती थोडक्यात वर्णन करायची असेल तर असे म्हणता येईल : भारताची राजकीय पक्षपद्धती कोसळली आहे. भारताची आर्थिक परिस्थिती विकलांग आहे. संमिश्र अर्थव्यवस्था ही वस्तुस्थिती असताना, घोषणा मात्र जहाल समाजवादाच्या आहेत. राज्यघटना बदलण्याइतके राजकीय सामर्थ्य नसल्याने ती डावलण्याचे, सुप्रीम कोर्टाबद्दल अनादर निर्माण करण्याचे छुपे कम्युनिस्ट धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले आहे. राष्ट्रपति व उपराष्ट्रपती यांनी अलीकडील केलेली भाषणे राज्यघटना अपरिवर्तनीय नाही असे सांगणारी आहेत. ज्या काँग्रेसने गेल्या वीस वर्षांत हुकमी बहुमत असताना अनेकदा घटना दुरुस्ती केली त्यांनी असे म्हणावे हाच विनोद आहे. राजकारणातील तत्त्वनिष्ठ आचरण जाऊन वैयक्तिक गटबाजीचे राजकारण केंद्र सरकारमध्ये चालू झाले आहे. भारताचे १९४७ पूर्वी नेतृत्व असलेले दुय्यम नेते आता सत्ताधीश आहेत आणि तेही आता थकलेले आहेत. नवे प्रश्न, नवी परिस्थिती निर्माण झाली आहे. निर्धारयुक्त निर्णयक्षम नेतृत्व मात्र या देशात आज उरलेले नाही. त्यामुळे एवढा मोठा देश निर्णायकी अवस्थेत वावरत आहे.

## काही हितप्रद गोष्टी

पण याही निराशाजनक परिस्थितीत काही हितकारक व देशाला आशा देणाऱ्या गोष्टी या देशात आहेत. एकतर गेल्या दोन-तीन निवडणुका शांतपणे पार पडल्यामुळे या देशातील लोकशाही यंत्रणा यशस्वी रीतीने आपण चालवू शकू असा आत्मविश्वास आला आहे. दुसरे असे की गेल्या वीस वर्षांतील आपल्या औद्योगिक प्रकल्पांमुळे आपले तंत्रज्ञ जागतिक दर्जा मिळविण्याइतके बुद्धिमान, कल्पक व साहसी आहेत हा अनुभव आला आहे. तिसरे असे की शेतकीतील तांत्रिक यशामुळे झालेल्या हरित क्रांतिवरून आपला शेतकरी प्रगतिशील आहे हे सिद्ध झाले आहे. तसेंच १९६२ चा पराभव आणि १९६५ मधील युद्धाचा अनुभव यामुळे संरक्षण आघाडीवरील आपली तयारी, आपल्या सैनिकांचे शौर्य यांची प्रचिती आपणास आली आहे. तेव्हा ज्याला साधन सामुग्री (Apparatus) म्हणता येईल ती आधुनिक व मजबूत आहे हे निर्विवाद आहे. सामाजिक क्षेत्रांतही जातिप्रथेला राजकारणी लोकांनी आसरा दिला असला तरी शहरीकरण व आधुनिकीकरण यामुळे जातींना सामाजिक प्रतिष्ठा उरलेली नाही. नवी राजकीय संस्कृति, नवी सामाजिक रचना, नवी भारतीयतेची जाणीव यांना आकार येत आहे.

असे हे आपले सामाजिक, आर्थिक व शासकीय चित्र आहे. मग तणाव कशामुळे निर्माण होत आहेत ? त्याची कारणे दोन आहेत. एक तर आपल्या नव्या लोकसत्ताक राज्यपद्धतीशी व स्वातंत्र्याच्या कल्पनेशी विसंगत अशी आपली आर्थिक व सामाजिक रचना आहे. आपले राजकारणीही सामाजिकदृष्टचा प्रतिगामी व राजकीयदृष्टचा

लोकशाहीवादी होते. आता ते आर्थिकदृष्ट्या पुरोगामी व सामाजिक दृष्ट्याप्रतिगामी आहेत. म्हणून जेव्हा सामाजिक शक्तीचे अंतर्गत चलनवलन (Social mobilisation) चालू होते त्यावेळी राजकारण व समाजकारण यांच्यात संघर्ष चालू होतात. क्रांति सदृश परिस्थिती निर्माण होते. हितसंबंधचा संघर्ष चालू होतो. समाजरचनेतील अंगभूत दोषाविरुद्ध नवी पिढी बंड करुन उठते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी आपली राज्यघटना घटनासमितीला सादर करताना असा इशारा दिला होता की आपण या राज्यघटनेद्वारे 'राजकीय समानतेचा स्वीकार करीत आहोत. पण तो केवळ सांगाडा आहे. त्याला अनुरुप अशी सामाजिक व आर्थिक समानता आपण निर्माण केली नाही तर तीच राज्यघटना उध्वस्त केली जाईल. अॅन्युरिन बेव्हननेही असंच म्हटले होते. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना लोकशाहीमध्ये जर स्थान मिळाले नाही तर लोकसभाही समाजवादाची शोकसभा ठरेल. तेव्हा संसदीय राज्यपद्धतीत पार्लमेंटमध्ये समाजातील सर्व ताणाव अत्यंत प्रभावीरीत्या प्रतिनिधीत्व करतात आणि जर बाहेरची सामाजिक परिस्थिती, आर्थिक रचना त्यांच्याशी विसंगत असेल तर राजकीय अस्थिरता येते. तेव्हा राजकीय अस्थिरता सामाजिक मंथनातून (political instability and Social mobilisation) सध्याची तंग परीस्थिती निर्माण झाली आहे. ती अपरिहार्य अवस्था आहे. त्यांतून जर समाजव्यापी राजकीय संघटना निर्माण झाली नाही तर राजकीय हिंसाचार व सैनिकी हुकुमशाही अटळ ठरेल.

## दुसरा संघर्ष

पण भारतात केवळ हितसंबंधांचा संघर्ष (Conflict of interest) चालू नसून सामाजिक, आध्यात्मिक मूल्यांचा संघर्षही (Conflict of Values) चालू आहे.



भारतातील समाज हा प्राचीन आहे. त्याची सांस्कृतिक परंपरा त्याच्या जीवनात ओतप्रोत भरलेली आहे. त्याची आध्यात्मिक जीवनदृष्टी हा त्याच्या वैयक्तिक नीतिमत्तेचा व सामाजिक नीतीचा पाया आहे. तेव्हा त्याच्याशी विसंगत, त्याचा जीवनमूल्यांचा उच्छेद करणारे असे एखादे तत्त्वज्ञान केवळ आर्थिक–सामाजिक मुक्तीच्या मुलाम्याखाली लादले गेले तर हा देश त्याला प्रतिकार केल्यावाचून रहाणार नाही. कारण कोणत्याही देशाची राष्ट्रवादी चळवळ त्या भूमीच्या परंपरे-पासून विलग होऊ शकणार नाही. भारत हा एकमेव देश असा आहे की त्यात ही मूल्ये व नवी समाजरचना यांचा संयोग येथे घडविता येईल. विशेषत: अमेरिका, रशिया, चीन या देशांतील समाजरचनेतून निर्माण झालेला पेचप्रसंग किंवा त्यांच्या-तील आध्यात्मिक पोकळी (Spiritual tenssion of Vacuum) हे जग पहात असताना असा एखादा आंधळा प्रयोग करणे बुद्धिवादाचे खास लक्षण नाही.

## तीन मूलभूत समस्या

म्हणून भारताची सद्य:स्थिती लक्षात घेतली की त्याच्यातून एखादा जुजबी व तकलादू मार्ग काढणे हा प्रश्न टाळण्याचा प्रकार ठरेल. भारताला भारतीयीकरण, आधुनिकीकरण व मूलगामी परिवर्तन (रॅडिकलायझेशन) या तीन्ही चळवळींची गरज आहे. भारतीयीकरणाचा हेतु धार्मिक नाही, सामाजिक व राष्ट्रीय परिवर्तन हा आहे. वीर सावरकरांच्या व्याख्येतील 'यस्य भारत भूमिका' असलेला हिंदूही आज नाही आणि मुसलमान वा ख्रिस्तीही नाही. 'भारत' हे प्रादेशिक राष्ट्रवादाचे निष्ठा प्रतीक म्हणून प्रथमच आपण स्वीकारीत आहोत. तेव्हा त्याच्याशी अंतिम निष्ठा निर्माण करणे व त्याच्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान बाळगणे हे धर्मातीत होऊनही संभवनीय ठरते. धर्माचा आचारात्मक प्रभाव कमी झाला आहे; पण त्या धर्माने दिलेली जीवनदृष्टी ही वेदांती आहे. ती विश्वव्यापी होऊ शकते. या अर्थाने भारतीयीकरणाकडे पाहिले पाहिजे; केवळ राजकीय दृष्टीने पहाता कामा नये. इहवाद विरुद्ध वेदांत हा संघर्ष असेल तर तो धार्मिक नाही, तात्त्विक आहे. थिऑ-लॉजी आणि फिलॉसफी यात फरक आहे.

दुसरी चळवळ आधुनिकीकरणाची आहे. हे आधुनिकीकरण सामाजिक, राज-कीय, आर्थिक, औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात करावयाचे आहे. आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण नव्हे हेही लक्षात ठेवले पाहिजे. कालविसंगत गोष्टींचा त्याग करण्यास सिद्ध असलेले व नाविन्याची व प्रगतीची ओढ असणारे मन ही भारताची गरज आहे. 'दोन शब्दांत दोन संस्कृती', 'विज्ञानवेडे व्हा' या सावर-करांच्या निबंधात याचे उत्कृष्ट विवेचन आहे.

तिसरी चळवळ मूलगामी परिवर्तनाची आहे. हा शब्द 'जहाल' या अर्थाने वापरला जातो. पण त्याचा अर्थ अधिक व्यापक आहे. भारताने जी संस्कृती

पृष्ठ ४० वर

— शरद श्री. चरनकर

# गैरसमज

'काय म्हणतेस ?' मनोहर.

'खरचं माझं प्रेम नाही.' मनीषा.

'म्हणजे आतापर्यंत...'

'तो एक खेळ होता...नाटक...तीन तासाचं.'

'पण का ?'

'माझी इच्छा'

'?'

'मला वाटलं...मी खेळ केला...'

'पण साधलंस काय...?'

'वेदना...'

'कुणाला ?'

'अर्थातच...तुला...'

'इतकंच...'

'त्यात मला आनंद मिळाला...'

'तू अशी असशील असं वाटलं नव्हतं...'

'अरे, त्यात काय ?...तोही एक मुखवटाच...'

'पण माझा बळी का ?'

'भुकेल्याला कुठलंही भक्ष्य चालतं...'

'तू पशू आहेस...'

'माझ्यापेक्षा फार भयंकर माणसं आहेत...'

'समाधान झालं...?'

'अरे, ही तर सुरुवात आहे...'

'म्हणजे...?'



'खरा आरोपी शोधायचाय...'
'काय ?'
'खरा दोषी कोण ते...'
'तो कशाला त्रास...?'
'नाही...त्याशिवाय अविश्वासाचं धुकं सरणार नाही.'
'बरं...एकूण तू माझा मार्ग रिकामा केलास...'
'नाही...अडथळा आपणहून दूर होतोय...'
'काऽय ?'
'असा काय बघतोस ? अरे, खुनी स्वतःला निरपराधीच समजत असतो...'
'तुझ्या बोलण्याचा अर्थ...'
'इथं नको...समोरच्या हॉटेलात जाऊ...तेथे सांगते...'
'सांग...काय सांगायचय ते लवकर सांग बरं ...'
'का ? कुठं अपॉइन्टमेन्ट आहे ?...'
'असली तरी...तुला काहीच कर्तव्य नाही...'

'का...?'
'ती प्रत्येकाची खाजगी बाब आहे...तो अधिकार तुला नाही...'
'पण काढून घ्यायचा म्हटला तर..'
'आता जमणार नाही...'
'अवघड जाईल...'
'अगदी धमकीच देते आहेस...'
'धमकी नाही सूचना...'
'पण जबरदस्ती का ?'
'कारण मला सूड घ्यायचाय...'
'सूड ? थांब जरा...वेटर...एक कॉफी...फस्क्लास...हं'
'होय...'
'कुणावर ?'
'स्पष्टच सांगते...तुझ्यावर...'
'पण का ? कशाचा...?'
'तू फसविलंस म्हणून...'
'मी फसविलं !'
'होय...तू...'
'उगाच बडबडू नकोस...'
'आता तसं वाटायचचं...'
'काय चुकलं माझं ?'
'आता गाडी रूळावर आली...'
'?'
'मघाशी म्हटलं ना आरोपी शोधायचाय...'
'तो मीच ना...'
'सरळ कबूल करतोयस...'
'पुराव्याशिवाय असल्या गोष्टी सिद्ध होत नाहीत...'
'दे उत्तर...स्मिता देसाई बरोबर हिंडत होतास ना...?'
'मी कुणाबरोबरही हिंडू शकतो...'

'तिच्याबरोबर सिनेमाला जात होतास...हॉटेलात जात होतास...मजा मारीत होतास...खरं की नाही ?'

'यात काय चुकलं ? मी काही करू शकतो आणि तुझ्यासारख्या शिकलेल्या... सुधारलेल्या मुलीने असा संशय घेणं म्हणजे...'

'आणि काय रे, मग मी त्या जोशीबरोबर बोलले, हॉटेलला गेले, तर का चिडत होतास ?'

'मला ते आवडत नाही...'

'सुधारणेचा मक्ता बायकांनीच घेतलेला नाही आणि मीही जर तसेच म्हटले तर...'

'पण...माझं प्रेम...'

'छट, ते प्रेम नव्हते, एक फसवणूक होती...'

'तुझा गैरसमज होतोय...'

'तिचं तुझ्या अपॉइन्टमेन्ट्बद्दलचं पत्र मला मिळालं आहे...'

'ते कसं काय...'

'ते तुला काय करायचचं...ती गोष्ट खरी आहे...'

'कदाचित ते पत्र...'

'नाही...म्हणजे तू तिला भेटत होतास हे आपोआपच कबूल करतोस की...'

'शब्दात पकडू नकोस...'

'तूच सापडलेला आहेस...'

'असंच जर मी तुला म्हटलं तर...'

'पुरावा काय?'

'हे बघ...तुला जोशीचं आलेलं पत्र...'

'ते...ते...तुझ्याकडं...'

'हा...हा...त्या दिलीपनं आणून दिलं...'

'पण...ते खोटं आहे...'

'असं तू म्हणतेस...?'

'तारीख बघ बरं...'

'१२-५-६७'

'आणि ही १५-३-६७.'

'म्हणजे?'

'प्रथम तू वाकडं पाऊल टाकलंस...'

'पण त्याला कारण काय होतं ठाऊक आहे?'

'कोणतं?'

'या पत्राच्या अगोदर जवळजवळ १५ दिवस तू माझ्याशी बोलत नव्हतीस...'

'म्हणून असे ना?'

'अर्थातच...'

'पण या पत्राच्या अगोदर किती 'तोंड' ओळख झाली होती कुणास ठाऊक?'

'नाही...ते मात्र खरं नाही. तू जेव्हा प्रतिसाद देईनाशी झालीस तेव्हाच मी तिच्याकडे वळलो.'

'पण तू मला न बोलण्याचं कारण कुठं विचारलंस?'

'तू धड बघतसुद्धा नव्हतीस नि बोलणार काय तू ?...तू नव्हेस...कॉफी ठेव हं...जाव...'

'मला नाही खरं वाटत ?'

'विश्वास ठेव...खरंच नाही...'

'पण माझी स्थिती माहित होती का तुला ?'

'नाही...'

'माझं त्यावेळी लग्न ठरत होतं...'

'मग तू का बोलली नाहीस...?'

'त्यावेळी तू दुसऱ्या फुलाच्या नादी लागला होतास...'

'पण...'

'नाही...स्त्रीचा मत्सर फार वाईट असतो...'

'माझंही चुकलंच...भलत्याच गैरसमजानं भलतंच करून बसलो...'

'मला वाटायचं तुला सांगावं...पण तुम्ही दोघे बोलताना दिसला...की माझी इच्छा मरून जायची. थोड्याच दिवसात 'ते' पत्र हाती पडलं नि...'

'मग तू त्या जोशीबरोबर का बोलत होतीस ?'

'तुल चिडविण्यासाठी...'

'म्हणजे...?'

'होय...त्यावेळी अजूनही वाटायचं की तो आपला होईल...पण...'

'पण काय ?'

'तुम्हा दोघांना 'रीगल'ला एकत्र पाहिलं अन्...माझी सहनशक्ती संपुष्टात आली...'

'पण एक सांग...'तसं' असतं तर आज मी तुला पुन्हा ते विचारलं असतं का ?

'का कुणास ठाऊक ? पुन्हा एकदा मृगजळामागे लावण्याचा हेतू...'

'नाही...अग...तुला काय सांगू ?'

'काय ?'

'सांगू ? ऐक...स्त्रीच्या मनात प्रेमविषयक मत्सर निर्माण केला की स्त्री दुप्पट वेगाने जवळ येते...असं म्हणतात...म्हणून...'

'तू स्मिताबरोबर हिंडत होतास...?'

'होय...पण...ती निघून गेली...'

'कोण ?'

'घटका आणि स्मिता...'

'म्हणजे ?'

'तिचं लग्न झालं.'

'म्हणून तू माझ्याकडं आलास...?'

'नाही...ती माझी मावसबहीण होती...'

'आं ऽऽ? काय म्हणालास ?'

'होय...तुला आपलंसं करण्याचा हा अघोरी मार्ग मी स्वीकारला...जसे पूर्वीचे मांत्रिक देव प्रसन्न करून घेण्यास जादूटोणा वापरीत...माझंच चुकलं. अंदाज चुकला...'

'खरं सांगतोयस...?'

'खरंच...एवीतेवी प्रेम पुन्हा नाहीच...तेव्हां तरी तुला खोटं बोलून काय साधणार ?...व्याधीवरचा उतारा व्याधी वाढण्यास कारणीभूत झाला...'

'मग...तू...आज...'

'होय शेवटाचाच निकाल...निकाल शेवटचाच असतो...पण प्रेमाच्या आशा निराशेच्या लाटा सोसणं कठीण झालं...म्हणून एक बुडावं तरी किंवा तरावं तरी या हेतूनं तुझ्या जहाजाला शेवटची साद घालतोय...ती ही दुरुनच...'

'माझा विश्वासचं बसत नाही...'

'आहे...खरं आहे...न्यायदेवतेच्या निर्णयाकडे ध्यास लागला आहे...दे एकदा उत्तर...जातो मी...पुन्हा येणार नाही...अपराधाला...'

'पण मी...?'

'तू ..? तू...?'

'...हां...मी कुठे जाऊ ?'

'म्हणजे...?'

'हां...जोशी गेला तो कायमचाच...परवाच्यां अपघातात त्याचं जीवन समाप्त झालं...पूर्णविराम मिळाला...मला मात्र अर्धविराम...या वेलीला...आता आसरा कुठला ?...माझं चुकलंय...मला माहित आहे...बघ...विचार कर. मी हतबल आहे. मघाच्या माझ्या बोलण्याचा तुला राग आला असेल...पण...पण मी ते भावनेच्या भरात बोलले रे ...बरं...आता मात्र मी तुझ्या मार्गातून आपणहून दूर होत आहे...'

'पण मी जाऊन देणार नाही...तू कशीही अस...मला चालेल...आपलं मीलन म्हणजे एकमेकांना क्षमा नाही का होणार ?'

'काय म्हणतोस ? एवढया मोठ्या मनाचा...'

'तू म्हणालीस ना...आता मुखवटा दूर झालाय...खरा मनोहर आहे हा...'

'किती सुन्दर...नाही रे दृष्ट लागंलसं वाटतयं...'

'आता...एकच तू अन '

'खरचं...खरचं का हे सारे ? का स्वप्न ?...नाही मला...'

'निश्चित वेड लागणार नाही...आता प्रेम तावून सुलाखून उजळलं आहे... आता ते भावनेच्या धुक्यात नाही तर विचाराच्या प्रकाशात आहे...'

'पण...पण...?'

'आता पण काढून टाक आणि एक पण कर...पण'

'आता कसला रे पण ?'

'एक विचारु ?'

'अं ऽ...विचार...'

'एक मनीषा आहे हं...'

'मनोहर आहे ना...?'

'तूच ठरव...अं ?'

'विचार ना लवकर...निवलेली कॉफी कडू लागते...'

'आता तरी प्रेम आहे ना माझ्यावर ?'

'कुणाचं ?'

'तुझं ?

'इश्य...असं काय ते ?'

'काय म्हणतेस ?'

'...मी बोलणार नाही हं... अशानं...

'ए, सांग ना...'

'काय...?'

'अशी रागावू नकोस हं...मग...माझं गृहीत बरोबर आहे ना...'

'आ ऽ ऽ ...हं...'

'खरचं ना ? बोल ना ?...हं...फक्त एकदाच...'

'सागरात मिसळल्यावर नदीला अस्तित्व उरतच नाही...'

'म्हणजे...एकूण माझं प्रमेय सुटलं तर...?'

'सिद्धता व्हायला हवी ना...?'

'तू अशी जवळी रहा...संकट ये किती महा, म्हटलयं ना कुणीतरी...?... वेडे, अग ही कॉफी निवली की ?...आपल्याला आता गोड...ताजी पाहिजे बुवा ?...'

'चल...' डोळे भिडले...विद्ध हृदयं भेटली...अगदी कडकडून...भावना डोळ्यात ओथंबल्या...तो पुटपुटला,

'बरेच काही सांगुन गेले...तुझे नेत्रसंकेत'






विनय कुबेर

लेखांक : आठ

'जपानी हल्ल्यातील भयकर फसवेगिरीचा भाग सोडून दिला तर या हल्ल्याची योजना आखण्यात व पार पाडण्यात जपानी सैन्याने दाखविलेली हुशारी खरोखरीच कौतुकास्पद होती. हा विमानहल्ला म्हणजे अत्यंत चतुराईने रचलेला व अचूक अंमलात आणलेला कौशल्यपूर्ण डावपेच होता ' हे मत कोणा ऐऱ्यागैऱ्याचे नव्हे ! ते खुद्द अॅडमिरल किमेलचे आहे !

अमेरिकन आरमारातील आठ युद्धनौका, तीन हलक्या क्रूझर्स, तीन विनाशिका व चार

इतर जहाजे अशा एकूण अठरा जहाजांना जपानी हल्ल्याचा तडाखा बसला ! यापैकी काही जहाजे पाण्यात बुडाली, काहींचा भयंकर विध्वंस झाला, मोडतोड झाली. जपान्यांनी एकूण तीन लाख टन वजनाचे अमेरिकन आरमार या हल्ल्यात निकामी करून टाकले ! हिकॅम, व्हीलर व इतर वैमानिक तळावरील दारुगोळा व इमारतींचा नाश झाला तो वेगळाच ! हवाईतील अमेरिकन विमानदलाच्या एकूण २३१ विमानांपैकी ६४ पूर्ण नष्ट झाली. उरलेल्यांपैकी फक्त ७९ विमाने तात्काळ वापरल्याइतपत सुस्थितीत राहिली ! सागरी विमानदलाचीही अर्ध्याहून अधिक विमाने नष्ट झाली !

जपान्याच्या दृष्टीने हा विजय अपूर्व होता. अमेरिकन सैन्य पूर्ण गाफील परिस्थितीत सापडल्यामुळेच जपान्यांना हे अलौकिक यश मिळाले ! अमेरिकनांना तडाखा देण्यासाठी त्यांनी एकाच वेळी ३५३ विमानांचा उपयोग केला. विमानातून टारपेडोफेक करण्याच्या तंत्रात त्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. पर्ल हार्बरमधील उथळ समुद्रात टारपेडो वापरता येणे अमेरिकनांना अशक्यप्राय वाटत होते. परंतु जपान्यांनी ही अशक्य गोष्ट घडवून दाखविली. अगदी अंतिमक्षणी त्यांनी उथळ पण्यातही प्रभावी ठरणारा टारपेडो शोधून काढला व त्याच्या सहाय्याने अमेरिकनांची दाणादाण उडविली ! शत्रूच्या जहाजांच्या डेकचे जाड लोखंडी कवच फोडण्यासाठी अमेरिकन आरमाराजवळ अत्यंत शक्तिमान असे १६ इंची तोफगोळे होते. स्वतःच्या जहाजांसाठी वापरलेल्या कवचाचा भेद खूप उंचीवरून टाकलेल्या बाँबनी होणार नाही असे त्यांना वाटे. पण या बाबतीतही जपान्यांनी त्यांच्यावर मात केली. त्यांनी खूप उंचीवरून विमानातून अत्यंत प्रभावी बाँबचा मारा केला आणि अमेरिकन जहाजांच्या डेकच्या चिरफळ्या उडविल्या !

परंतु एका घटनेने जपान्यांची घोर निराशा झाली. जेंडा व फुशिडा ज्या अमेरिकन विमानवाहकांचा नाश करण्यासाठी उत्सुक होते, त्यांचे त्यांना साधे दर्शनही घडले नाही ! त्या दिवशी सर्व विमानवाहक जहाजे पर्ल हार्बरबाहेर होती. त्यापैकी 'एंटरप्राईझ' तर जपान्याच्या तावडीतून अगदी थोडक्यात निसटले ! ते वेक बेटाकडून पर्ल बंदराकडे वाटचाल करीत होते. समुद्र अत्यंत खवळलेला होता. बरोबरच्या विनाशिकात इंधन भरण्याची जरूर भासली. खवळलेल्या सागरात या कामासाठी अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला. त्यामुळे 'एंटरप्राईझ'ला ओहूला पोचण्यास विलंब झाला. या विलंबामुळे त्याला जीवदान मिळाले ! फुशिडाच्या नेतृत्वाखालील पहिल्या फेरीने हवाईवर हल्ला केला त्यावेळी ते तेथून फक्त २०० मैल अंतरावर होते !

जपान्यांनी ओहूमधील कारखाने व वर्कशॉप यांचेकडे केलेले दुर्लक्ष ही त्यांची घोडचूक ठरली. मोडतोड झालेल्या जहाजांची झटपट दुरुस्ती करण्यासाठी या कारखान्यांची मदत फार उपयुक्त ठरणार होती. कोठल्याही आरमाराच्या हालचाली-

साठी अत्यावश्यक असणारी दुसरी वस्तू म्हणजे इंधन ! इंधन हे जणू जहाजांचे रक्त असते ! अमेरिकनांनी हवाईत भूमिगत तेलटाक्या बांधण्यास नुकतीच सुरुवात केलेली होती. परंतु युद्धप्रसंगी तेलाचा प्रचंड सागर जमिनीवरील टाक्यातच साठवून ठेवलेला होता. जपान्यांनी त्यात एक ठिणगी जरी टाकली असती तरी हा प्रचंड साठा भस्मसात झाला असता. परिणामी सर्व अमेरिकन आरमाराच्या नाड्याच आखडल्या गेल्या असत्या ! बचावलेले सर्व आरमार निमूटपणे अमेरिकेस परत गेले असते. आणि प्रशांत महासागरावर जपान्यांचे अधिराज्य कित्येक महिने अबाधितपणे चालू राहिले असते.

'निओशो' हे तेलवाहू जहाज तर फारच मोठ्या संकटातून बचावले. हल्ल्याच्या वेळी ते फोर्ड बेटावरील तेलसाठ्याच्या नजीकच्या धक्क्यावर उभे होते. अमेरिकनांच्या सुदैवाने निओशोवर एकही बाँब पडला नाही. अन्यथा त्याचा स्फोट होऊन जो अग्निप्रलय झाला असता त्यात जवळपास उभ्या असलेल्या मेरिलॅण्ड, टेनिसी, ओक्लोहोमा व वेस्ट व्हर्जिनिया या चारी युद्धनौका भस्मसात झाल्या असत्या. कॅप्टन फिलीप्स याने प्रसंगावधान राखून हे अत्यंत धोकादायक जहाज झटपट बंदराबाहेर नेले. जपानी वैमानिक इतर महत्त्वाच्या कामात गुंतलेले असल्यामुळे त्यांचे 'निओशो'कडे दुर्लक्ष झाले.

पर्ल हार्बरवरील चढाईत जपानी पाणबुड्यांचा प्रभाव मुळीच जाणवला नाही ! असे का घडले याचे स्पष्टीकरण जपानी नौदल अजूनही देऊ शकत नाही.

ॲडमिरल किमेलकडे पर्ल हार्बरमध्ये फक्त ९ पाणबुड्या होत्या. त्यांच्याविरुद्ध जपान्यांनी एकूण ३० पाणबुड्या युद्धात लोटल्या ! त्यापैकी २५ मोठ्या आकाराच्या व ५ लहान-दोन माणसे बसू शकतील एवढ्या होत्या. हल्ल्याअगोदरचे कित्येक दिवस या सर्व पाणबुड्यांचा प्रशांत महासागरात संचार सुरू असला पाहिजे ! हल्ल्याच्या वेळी त्या हवाई बेटाभोवती घोटाळत असल्या पाहिजेत. त्यांच्यासाठी बरीच कामगिरीही उपलब्ध होती. लहान पाणबुड्यांना बंदरात घुसून मोडतोड झालेल्या जहाजांचा पुरता निकाल लावता आला असता. मोठ्या पाणबुड्यांना समुद्रात कोसळणाऱ्या जपानी वैमानिकांची सुटका करता आली असती. शिवाय बंदराबाहेर निसटू पाहणाऱ्या जहाजांना अडवून त्यांचा निकाल लावणे त्यांना शक्य होते.

जपानी पाणबुड्यांमधील सैनिकात साहस अथवा कौशल्य यांचा अभाव असावा. अन्यथा बंदराकडे परतणाऱ्या एंटरप्राईझ व तीन क्रूझर्स यांची तरी त्यांनी भर समुद्रात मेजवानी अवश्य झोडली असती ! ये जा करणारी इतर अमेरिकन जहाजेही त्यांची भक्ष्य बनली असती ! निव्वळ या एकाच युद्धप्रकारात अमेरिकन आरमार जपान्यांवर मात करू शकले ! किमेलची जहाजे पाणबुड्याबाबत कधीही गाफील नसत ! शत्रूच्या पाणबुड्यांचा चढाईचा प्रयत्न ती तत्क्षणी उधळून लावीत !

त्यांनी जपान्यांच्या एका मोठ्या व चार लहान पाणबुड्यांचा धुव्वा उडविला! आणखी एका लहान पाणबुडीला किनाऱ्यावर येऊन शरणागती द्यावी लागली! अशा रीतीने सर्व जपानी पाणबुडीदल निष्प्रभ ठरले!

## जपानमधील विजयोत्सव

पर्ल हार्बरवरील जपानी चढाईच्या बातमीमुळे अमेरिकन जनता जितकी थक्क झाली तितकीच जपानी जनताही झाली! जपानमध्ये सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले. वर्तमानपत्राच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघू लागल्या. वर्तमानपत्रविक्रे ताज्या बातम्या जोरजोराने ओरडत रस्त्यावरून धावू लागले. लोक वर्तमानपत्रांवर तुटून पडू लागले.

या वर्तमानपत्रांतील शीर्षके व संपादकीय लेखावरून जपानी राष्ट्राचा उत्साह कसा ओसंडून चालला होता हे दिसते. 'जपानी जनता ज्याची अधीरतेने वाट पहात होती तो दिवस अखेर आला! दहा कोटीच्या जपानी राष्ट्राचा आज सोनियाचा दिवस आहे!'

जपानला यापुढील काळच खरा कठीण ठरणार आहे याची लष्करी व राजकीय नेत्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे ते स्वत: शांत होते. जनतेला या वस्तुस्थितीची उघड जाणीव देऊन तिच्या ओसडून जाणाऱ्या उत्साहाला बांध घालण्याचा प्रयत्न ते करीत होते, परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे फार काळ दबून राहिलेल्या जपानी राष्ट्राच्या उत्साहाला आवर घालणे सोपे नव्हते! जपानी वर्तमानपत्रांच्या वढाया सुरूच होत्या. 'आम्हाला हव्या असलेल्या सर्व गोष्टी आम्ही स्वत:च्या हिंमतीवर मिळवू शकतो हे सिद्ध झाले आहे!' 'इतिहासाचे पारडे अखेर अक्षराष्ट्रांच्या (जपान–जर्मनी–इटली) बाजूला झुकले आहे!' 'जपानी फौजा जगात अजिंक्य आहेत हे आम्ही उच्चरवाने सांगू इच्छितो!'

सागरी विमानदलाच्या ज्या सैनिकांनी पर्ल हार्बरच्या युद्धात विजय मिळविला ते अजून परतीच्या मार्गावर समुद्रातच होते. पण देशातील पायदळ व विमानदलाचे सैनिकही जनतेच्या कौतुकास पात्र ठरले. आरमाराच्या कर्तृत्वामुळे सर्वत्र जपानी सैन्यदलांची प्रतिष्ठा वाढली.

२२ डिसेंबर रोजी पहिले सागरी विमानदल त्याच्या विजयी मोहिमेवरून मायभूमीस परतले. त्यांच्या स्वागतासाठी अफाट जनसागर लोटला! सैनिकांवर फुले उधळण्यात आली! त्यांच्या स्वागताप्रीत्यर्थ मेजवानी देण्यात आली. पुढाऱ्यांनी भाषणातून त्यांच्या कर्तृत्वाबद्दल, त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. छायाचित्रकारांनी सैनिकांभोवती गर्दी केली. पत्रकारांनी युद्धाच्या हकीगतीसाठी त्यांचा पिच्छा पुरविला!

नौसेनापतिमंडळाचा प्रमुख ॲडमिरल नगानो याने पर्ल हार्बर मोहिमेबद्दल यामामोटोला तीव्र विरोध केला होता. तोही या वीरांची जाहीर प्रशंसा करण्यात

मनमोकळेपणाने सामील झाला. सर्वांना ऐकू येईल इतक्या जोराने तो ओरडला, 'शाबास वीरांनो शाबास! तुम्ही मातृभूमीची शान राखलीत!'

या विजयोत्सवात एकटा यामामोटो शांत होता. त्याच्याच प्रेरणेने त्याच्या सैनिकांनी केलेल्या महत्कार्याबद्दल त्याला आनंद होणार नाही हे कसे शक्य आहे? हा विजय साकार करण्यासाठी सैनिकांनी सोसलेल्या अपार कष्टाची व बलिदानाची जाणीव त्याला असलीच पाहिजे! पण काळाच्या वाटचालीबरोबर हे बलिदान व्यर्थ तर ठरणार नाही ना या शंकेने त्याला ग्रासले होते! आपल्या भाषणात त्याने सैनिकांना सांगितले, 'पर्ल हार्बर मोहिमेत तुमचा विजय झाला याबद्दल मी तुमचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. परंतु मला या प्रसंगी भविष्यकालाबद्दल एक इशारा द्यायचा आहे. या क्षणिक विजयामुळे आपण स्वसंतुष्ट व गाफील राहणे अंती घातक ठरेल. आपल्या मातृभूमीचा कठीण काळ अजून संपलेला नाही. उलट आता कुठे तो सुरू होत आहे! तुम्हाला अशी कित्येक रणांगणे यापुढे लढवावी लागणार आहेत!'

नागरिकांच्या जास्तीत जास्त कौतुकास पात्र ठरला कमांडर फुशिडा! त्यांनी अक्षरशः त्याला खांद्यावर उचलून नाचविले! वृत्तपत्रातून त्याच्या असंख्य मुलाखती झळकल्या! त्याला 'लायन' (Lion) हा सन्माननीय किताब देण्यात आला. त्याच्या सन्मानार्थ मोठमोठ्या मेजवान्या झडल्या! त्याचा सर्वात मोठा मान राजेसाहेबांनी केला. त्यांनी फुशिडाच्या तोंडून या अद्भुत युद्धाचे वर्णन ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली! हे भाग्य फारच थोडया जपानी नागरिकांना आयुष्यात लाभते! अॅडमिरल नगानोने फुशिडाची 'स्वर्गपुत्रां'शी (जपानच्या राजेसाहेबांचा सन्माननीय किताब) भेट ठरविली!

परंतु या ठिकाणी एक नवेच लचांड उपस्थित झाले! फुशिडा व दुसऱ्या फेरीचा नेता शिमाझाकी हे कनिष्ठ दर्जाचे लष्करी अधिकारी होते. त्यांची भेट राजेसाहेबांनी घेणे शाही शिष्टाचारात बसत नाही असा आक्षेप काहींनी घेतला. नगुमोचा हुद्दा उच्च दर्जाचा असल्यामुळे राजेसाहेबांनी त्याला भेटणे शिष्टसंमत होते. अखेर ही अडचण दूर करण्यासाठी फुशिडा व शिमाझाकी या दोघांना 'नौदल प्रमुखाचे खास मदतनीस' असा खास हुद्दा देण्यात आला! नगुमी, फुशिडा व शिमाझाकी यांचेसह अॅडमिरल नगानो राजेसाहेबांच्या प्रासादात उपस्थित झाला.

भेटीसाठी १५ मिनिटाचा अवधी देण्यात आला होता. परंतु तो ४५ मिनिटांपर्यंत वाढला. राजेसाहेबांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना फुशिडाने त्यांच्याशी थेट संभाषण केले. (राजेसाहेबांच्या खासगी सचिवाने त्यांच्यातर्फे प्रश्न विचारायचे व उत्तरे देणाऱ्यानेही ती सचिवास उद्देशूनच द्यायची अशी प्रथा होती.) परंतु फुशिडाच्या या गुन्ह्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

राजेसाहेबांनी तीन गोष्टींची विशेष चौकशी] केली. पर्ल बंदरातील वैद्यकीय जहाजांवर अनवधानाने हल्ला झाला काय ? काही बिनलढाऊ [विमाने पाडण्यात आली काय ? बिनलढाऊ नागरिकांवर हल्ला करण्यात आला काय ? वरीलपैकी कसलीही चूक जपानी विमानदलाने केली नाही, असे फुशिडाने निश्चयपूर्वक सांगितले.

संभाषण करताना फुशिडा वरचेवर अडखळत होता. अस्वस्थतेने त्याचे सर्वांग कापत होते. मुलाखत संपताच मनावरील दडपण नष्ट झाल्यामुळे त्याला हायसे वाटले. ' राजेसाहेबांसमोर युद्धाची हकीगत सांगणे हे आपल्याला प्रत्यक्ष युद्ध करण्यापेक्षाही कठीण वाटले ' अशी कबुली त्याने दिली !

सौंदर्य शास्त्र व प्रतिकात्मकता यांची आवड जपानी लोकांच्या रक्तातच भिनलेली असते. पाश्चात्यांना या गोष्टीचे मोठेच आश्चर्य वाटते. देश दीर्घ मुदतीच्या भयंकर युद्धात गुंतला असतानाही जपान्यांची ही आवड दबू शकली नाही.

प्रत्येक नववर्षाच्या स्वागतासाठी जपानमध्ये काव्ये रचली जातात. या काव्यांचा विषय स्वतः राजेसाहेब सुचवितात. १९४२ या वर्षाच्या स्वागतासाठी त्यांनी ' पहाडावरील मेघ ' हा विषय सुचविला.

जपानी परराष्ट्रखात्याचे मुखपत्र ' जपान टाईम्स ॲण्ड ॲडव्हर्टायझर 'ने राजेसाहेबांच्या प्रस्तावाबद्दल म्हटले, ' पहाडावरील मेघ हे नूतन दिवसाचे दूत असतात. प्रभातकालचा पहिला मंगल सूर्यकिरण प्रथम पर्वतशिखरांना वेढणाऱ्या मेघांना स्पर्श करतो. हळूहळू त्यांच्यावर चमकदार वैभवशाली सोनछटा पसरू लागते. ही लखलखणारी छटा नववर्षाची प्रसादचिन्हे दर्शविते. या नववर्षाचे स्वागत करीत असता जपानी राष्ट्राने पूर्व आशियाची ' नवी घडी ' बसविण्याच्या सत्कार्यास प्रारंभ केला आहे. '

अशा रीतीने जपानी साम्राज्यात तथाकथित ' स्वर्गीय शांतीचे ' १७ वे संवत्सर सुरू झाले ! प्रशांत महासागराला युद्धज्वालांनी वेढले होते. जपानच्या प्रारंभीच्या झटपट यशामुळे त्यांच्या ' उगवत्या सूर्याच्या ' चिन्हाला अपूर्व प्रभा चढली होती ! क्षितिजावरील दूरदूरच्या अनेक राष्ट्रांना या बालरवीचे चटके बसू लागले होते ! एकूण १ जानेवारी १९४२ हा दिवस जपानच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला ! त्या दिवशी जपान यशाच्या सर्वोच्च शिखरावर चढून जणू ढगावर तरंगत होता ! परंतु कित्येकदा यशाच्या सर्वोच्च शिखरामागेच दारुण पराभवाची खोल दरी लपलेली असते ! युद्धातील विजयापाठोपाठच तो पचविण्याची अत्यंत अवघड जबाबदारी राष्ट्रावर येत असते विजयाने धुंद झालेल्या जपानी राष्ट्राला त्या धुंदीत भविष्यकालाची चाहूल लागली नाही.

## जपानची दारुण शोकांतिका !

या दिग्विजयी राष्ट्राचे यशोशिखरावरून तावडतोब अधःपतन झाले नाही.

प्रथम प्रथम ते फार सावकाश घडले. परंतु त्याची पराभवाकडे वाटचाल ७ डिसेंबर १९४१ या दिवशीच चालू झाली होती. ती घडणे अटळच होते! जपानने आपली कुवत न ओळखता अमेरिकन भस्मासुराला झोपेतून जागे केले होते. अखेर या भस्मासुराने अणुबाँबसारखे प्रलयंकर शस्त्र वापरून जपानची राखरांगोळी केली!

पर्ल हार्बर युद्धाच्या जुगारात जपानचे नशीबच फळफळले. हे युद्ध जपानने अद्वितीय कौशल्याने, अलौकिक शौर्याने व तितक्याच हिडीस क्रूरतेने लढविले! परंतु या पहिल्यावहिल्या विजयासारखा दैदीप्यमान क्षण राजे हिरोहीतोंच्या फौजांना पुन्हा कधीच अनुभवता आला नाही. एकाग्र वृत्ती, पहिल्या दर्जाचे यांत्रिक कौशल्य, भयंकर सोशिकता, अजोड देशप्रेम आणि यशस्वी हेरगिरी या गुणांच्या दैवी देणगीमुळे जपानी फौजांच्या शिरावर पर्ल हार्बरच्या विजयाचा डौलदार तुरा खोवला गेला! परंतु त्याचा अधिक उपयोग करून घेण्यासाठी त्यांना दुर्दैवाने वेळच मिळाला नाही!

या युद्धानंतर प्रशांत महासागरात जपानी आरमाराला आव्हान देणारी शक्ती शिल्लक उरलेली नाही अशी घमेंड जपानला होती. परंतु सहाच महिन्यांनी 'मिडवे' नजीक झालेल्या तुंबळ युद्धात अमेरिकनांनी 'अकागी, कागा, सोर्यू आणि हिर्यू, या चार जपानी विमानवाहकांना जलसमाधी दिली!

या प्रचंड पराभवाने जपान्यांना भोवळ आली! त्यांच्या विजयी 'सागरी विमानदला'ची दुर्दशा झाली! प्रशांत महासागरातील युद्धाचे पारडे फिरले! त्यानंतर लैपान व लीयर आखातातील युद्धात जपानी आरमाराचे पेकाटच मोडले! त्यांच्या एकेकाळच्या बलाढ्य आरमाराचा उल्लेख 'डबक्यातील आरमार' असा होऊ लागला!

टोकियोतील नौसेनापती मंडळाच्या कचेरीची लाल इमारत युद्धाअखेर बाँबफेकीमुळे उध्वस्त झाली. त्या जागेस भग्न, जळत्या अवशेषांच्या भयाण स्मशानभूमीची कळा आली! 'नगाटो' ही जपानी आरमाराची ध्वजनौका एकेकाळी जपानी सैन्यसामर्थ्याचे मानचिन्ह ठरली होती. यामामोटोने युद्धातील डावपेचांचे मनसुबे तिच्या विशाल डेकवरच रचले होते. युद्धानंतर हीच नौका जपानच्या भयंकर शोकांतिकेचे प्रतीक बनली! तिचा बाँबफेकीमुळे विद्रूप झालेला सांगाडा योकोसुका आखातात ओढून आणून तसाच सोडून देण्यात आला!

कमांडर जेंडा युद्धानंतर जपानी विमानदलाचा प्रमुख झाला. त्यानंतर तो जपानी पार्लमेंटचा सदस्य व अमेरिकेचा सच्चा मित्रही बनला. मिडवेच्या युद्धात 'अकागी'ने सागरतळाचा ठाव घेतला, फुशिडाच्या पायांना गोळ्या लागून भयंकर जखमा झाल्या. पण तो त्यातूनही वाचला. पुढे त्याने श्रद्धाळू ख्रिश्चन धर्मोपदेशक म्हणून किर्ती मिळविली! पण पर्ल हार्बरच्या युद्धामुळे पुढे जो युद्धाचा वणवा भडकला त्यात या युद्धात भाग घेणारे बहुतेक वीर भस्मसात झाले!

हल्ल्याच्या पहिल्या फेरीतील कर्दनकाळ झीरो विमानांचा नेता लेफ्टनंट कमांडर इटाया जुलै १९४२ मध्ये धुक्यात गुरफटलेल्या भयाण् बुराईल्स भागात मारला गेला! जपानी वैमानिकांनीच त्याला शत्रू समजून त्याचे विमान उध्वस्त केले! फुशिडाच्या सूरमाऱ्या बाँबर्सचा नेता ले. कमांडर ताकाहाशी याने त्याच वर्षी मे महिन्यात अलौकिक शौर्य गाजवून मृत्यूला कवटाळले! दुसऱ्या फेरीचा नेता शिमाझाकी जानेवारी १९४५ मध्ये फार्मोसा व फिलीपाईन्स यांच्या दरम्यान समुद्रात कोसळला! ले. कमांडर एगुसा या सूरमाऱ्या बाँबर्सच्या नेत्याचे विमान १६ जून १९४४ रोजी सैपान येथे कोसळले! त्याचे त्याप्रसंगीचे अलौकिक शौर्य जपानी वैमानिकांना अखेरपर्यंत स्फूर्तिप्रद ठरले!

पर्ल हार्बर मोहिमेचा श्रद्धेने पुरस्कार करणारा यामागुची मिडवेच्या युद्धात 'सोर्यू'सह सागरतळाला गेला. त्याने स्वतःची सुटका करून घेण्यास साफ नकार दिला! स्वहस्ते इतिहास घडविणाऱ्या नगुमोने सैपान येथे लढताना देह ठेवला!

जपानी आरमाराचा प्रमुख अ‍ॅडमिरल यामामोटो याची आहुति घेण्यासही रणदेवता चुकली नाही! १८ एप्रिल १९४३ रोजी त्याने आघाडीच्या पाहणीसाठी दौरा काढला. अमेरिकन हेरखात्याला जपानी गुप्तसंदेश पद्धत ज्ञात होतीच. त्यामुळे त्याला या दौऱ्याची इत्थंभूत माहिती मिळाली. धुक्यात गुरफटलेल्या लालभडक बोगनवेलींच्या किर्र जंगलातून प्रवास करताना एका अमेरिकन पी-३८ विमानाने यामामोटोच्या मोटारीवर हल्ला करून त्याचा बळी घेतला!

## युद्धाने शिकविलेला धडा

या युद्धात पर्ल हार्बरमधील अमेरिकन आरमाराचा झाला त्याहूनही अधिक विध्वंस होऊ शकला असता! नौदल यार्ड, वर्कशॉप्स व नौसेनातळावरील महत्त्वाची यंत्रसामुग्री यांना 'नौदलामागील नौदल' असे संबोधण्यात येते. त्याचा उपयोग करून नवीन जहाजे बांधणे व विध्वंस झालेल्या जहाजांची झटपट दुरुस्ती करणे शक्य होते. उध्वस्त आरमार काही कालातच पुन्हा उभारणे शक्य होते. या महत्त्वाच्या विभागांचा पुरता निकाल न लावण्याची घोडचूक जपान्यांनी केली. शरीरात रक्ताचे जितके महत्व असते तितकेच आरमाराला इंधन-तेलाचे असते. त्याविना कितीही बलाढ्य आरमार पांगळे बनते! इतक्या महत्त्वाच्या तेलसाठ्याला जपान्यांनी धक्काही लावला नाही. आठवडा अखेर सर्व जहाजे बंदरातच ठेवण्याचा अ‍ॅडमिरल किमेलचा निर्णय अखेर शहाणपणाचाच ठरला! ही जहाजे खोल समुद्रात असती तर नगुमोच्या दंगलखोरांनी ती कायमची सागर तळाला धाडली असती! परंतु ती बंदरातच बुडाल्यामुळे दुसऱ्याच दिवशी वर काढून पुन्हा युद्धसज्ज करणे किमेलला शक्य झाले!

अमेरिकन आरमार पुरते विकल बनावे यासाठी त्यांच्यावर आणखी एक हल्ला करणे आवश्यक होते. नगुमोने जपानी वैमानिकांना तशी संधी नाकारली. कमांडर

जेंडाला या गोष्टीबद्दल पुढे वारंवार वाईट वाटले. पुढे सिंहावलोकन करताना तो म्हणतो, 'आम्ही पर्ल हार्बरचा पुरता निकाल लावून, शिवाय 'एंटरप्राईझ' व 'लेक्झिंटन' या जहाजांना सागरतळ दाखविला असता तर प्रशांत महासागरातील युद्धाचा निर्णय वेगळाच लागला असता! आम्ही फक्त एकाच चढाईवर समाधान मानले ही चूक घातकी ठरली. अमेरिकनांचा पुरता पाडाव करण्यासाठी त्यांच्यावर त्याचवेळी पुन्हा पुन्हा हल्ले चढविणे अत्यावश्यक होते.'

किमेलनंतर हवाईमधील अमेरिकन आरमाराचा प्रमुख झालेला अॅडमिरल निमित्झ व इतर अनेक अमेरिकन आरमाराधिकारी जेंडाशी सहमत झाले. अॅडमिरल निमित्झ एके ठिकाणी लिहितो, "प्रशांत महासागरातील युद्धाचा अभ्यास करणारे युद्धशास्त्राचे भावी विद्यार्थी पर्ल हार्बरबद्दल हेच म्हणतील, की पर्ल हार्बरवर पुन्हा हल्ला करण्याची सुवर्णसंधी जपानी सेनापतीने व्यर्थ दवडली! आपले उद्देश मर्यादित ठेवण्यात त्याने घोडचूक केली."

कित्येक अमेरिकन नौसेनाधिकाऱ्यांच्या मते पर्ल हार्बरच्या चढाईचे स्वरूप सौम्यच होते. तेथे मनुष्यहानी मात्र अफाट झाली! एकूण अप्रचलित झालेले व गंजलेले बरेच लोखंड सागरतळाला धाडून जपान्यांनी अमेरिकेवर मोठी मेहेरबानीच केली! सागरी विमानदल सामर्थ्य हाच आधुनिक आरमाराचा कणा असतो याची जाणीव जपान्यांनी अमेरिकनांना करून दिली! दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी अमेरिकेने उपकारक अलिप्ततेची फळे चाखली. त्यानंतर जपानने तिला युद्धात ओढले. त्यांची पहिली धक्कादायक चढाई हवाईवर करून त्यांनी मतभेदांनी बुजबुजलेल्या अमेरिकन राष्ट्रातील ऐक्य पुन्हा वाढीस लावले!

या कामगिरीबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी जपानी सेनापतींना पदके बहाल करावीत असेही विनोदाने म्हटले जाते!

सध्याचे जग तर अफाट अणुसामर्थ्याच्या युगात वावरते आहे! थंडे युद्ध, आंतरराष्ट्रीय तणातणी, मित्रराष्ट्रांकडून होणारा विश्वासघात ही या युगाची वैशिष्टये आहेत. या नव्या युगातील जनतेच्या व तिच्या नेत्यांच्या राजकीय शिक्षणात पर्ल हार्बरचे प्रकरण असणे अत्यावश्यक आहे. जागतिक इतिहासात पुन्हा पुन्हा सिद्ध झालेल्या कटु सत्याची जाणीव हे प्रकरण सतत देत राहील.

'आंतरराष्ट्रीय राजकारणातील भावी घटनांचा अंदाज करणे कठीण असते. त्यातील बहुतेक सर्व घटना अनपेक्षितपणेच घडत असतात!'

# समाप्त

जोपासली ती शेतीच्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत होती. आता जगात उद्योगीकरण व तंत्रविद्या यामुळे व्यक्ती, समाज यांची नाती, त्यांचे संबंध बदलत आहेत. स्त्री, हरिजन यांच्याकडे पहाण्याची भारतीयांची दृष्टी पुराणमतवादी आहे. तिच्यात मूलगामी परिवर्तन केल्याविना नव्या राजकीय संस्कृतीशी आपला मेळ बसविता येणार नाही. तसेच नवी बहुजनसमाजाची राजसत्ता (Power to the masses) ही आता टाळण्यासारखी गोष्ट नाही. तेव्हा त्या बहुजनसमाजाशी मेळ घालावयाचा असेल तर शिक्षणाबरोबरच आपल्या मनोवृत्तींतून मूलगामी परिवर्तन करावे लागेल. तरच आपण लोकशाही यशस्वी रीत्या चालवू शकू.

## आजची पक्षीय धूळफेक

या सर्व विवेचनावरून हे लक्षात येईल की भारताची सद्यःस्थिती गुंतागुंतीची आहे. त्यातून राजकीय जादूगिरीने किंवा एकाद्या व्यक्तीच्या मोहिनीने (कॅरिस्मा) मार्ग निघण्यासारखा नाही. एका अर्थाने महापुरुष हे सार्वजनिक संकट असते. भारतीयांना अशा अवतारी पुरुषांची वाट पहाण्याची आणि त्याच्या हाती आपली सूत्रे देऊन स्वतः स्वस्थ बसण्याची सवय आहे. हा पळपुटेपणा आहे. प्रश्नांना सामोरे जाणारा समाज स्वतःमध्ये गुणवत्तेवर आधारलेले परिवर्तन व क्रांती घडवीत असतो. म्हणून भारतीयांनी आता एकाद्या अवतारी पुरुषाची किंवा हुकुमशहाची मानसपूजा करण्याचे टाकून दिले पाहिजे.

दुसरे असे की कॉंग्रेस किंवा इतर कोणताही पक्ष आज संघटनात्मक दृष्टया इतका सबळ नाही की जो हे सारे ओझे आपल्या अंगावर घेऊ शकेल. म्हणून निवडणुकीच्या या हंगामात कोणी इंदिरा गांधीचे हात बळकट करा, म्हणजे भारताला राजकीय स्थैर्य मिळेल असे सांगितले तर ते ऐकून घ्यावे पण हास्यास्पद आहे असे मानावे, अशी त्यांची आज स्थिती आहे. याची सर्व चर्चा येथे शक्य नाही; पण भारतातील १७ राज्यांपैकी ८ राज्यात त्यांची सत्ता आहे. तेथेही त्यांचा प्रभाव किती आहे हे आता निवडणुकीत दिसेलच. उरलेल्या ९ राज्यात जनसंघ, कम्युनिस्ट, सं. सो. पा., स्वतंत्र, भा. क्रां. दल, संघटना कॉंग्रेस हे पक्ष राज्य करीत आहेत. त्या सर्व राज्याची लोकसंख्या एवढी आहे की तेथे जे घडेल तेच केंद्र सरकारमध्ये घडेल. या सर्व राज्यात नव कॉंग्रेसची संघटना नाममात्र आहे. इतरही राज्यात ती निर्भेळ इंदिरावादी आहे असे मानण्याचे कारण नाही. इंदिराबाईंच्या कॉंग्रेसमध्ये चव्हाण, सुखाडिया, ब्रह्मानंद रेड्डी यांची प्रादेशिक सुभे-

दारी आहे. ती राजकीय सोयरीक आहे. तिला तात्विक मुलामा दिला आहे. जो दहा कलमी कार्यक्रम चव्हाण मानतात तोच आता कॉंग्रेस संघटना मानते. स्वतंत्र पक्षही म्हणतो की लखनौ कॉंग्रेसचा जाहीरनामा हा त्यांचा जाहीरनामा आहे. सं. सो. पा. त्या सर्वांच्या पुढे आहे आणि जनसंघही आता आर्थिक परिवर्तनाची स्वतःची भूमिका तयार करीत आहे. अशा परिस्थितीत डावे कम्युनिस्ट सोडले तर इतर कोणत्याही पक्षात आर्थिक कार्यक्रमावर कोणताही मूलभूत मतभेद नाही. प्रश्न अग्रहक्काचा व शक्याशक्यतेचा आहे. हे सगळे जेव्हा राष्ट्रीय विकास मंडळात जमतात तेव्हा डॉ. गाडगीळांचे सर्वांनाच ऐकावे लागते. कारण तेथे रोकडा व्यवहार असतो, केवळ तत्त्वमंथन निरुपयोगी असते.

## नव्या पक्षाची गरज

म्हणून या देशांत आता काही वर्षे एकपक्षीय केंद्रीय सरकार येईल ही कल्पनाच सोडून द्यावी लागणार आहे. मग उरते ते कम्युनिस्टांसह संमिश्र सरकार किंवा कम्युनिस्टांना टाळून संमिश्र सरकार. येत्या निवडणुकीत याच पर्यायाचा विचार प्रबळ होईल. मतदारांना एकाची निवड करावी लागेल. तीही अंतिम ठरण्याची शक्यता नाही. वर सांगितलेल्या तीन्ही चळवळी करण्यास समर्थ व तीन्ही प्रश्नांबावत स्वतःची ठाम भूमिका असलेला एकही पक्ष आज नाही.

म्हणून भारतीयकिरण, आधुनिकीकरण व मूलभूत परिवर्तन हे तत्वतः मान्य करणाऱ्या पक्षांची फळी हाच एक पर्याय उरतो. त्या सर्वांच्या राजकीय सहयोगांतून एकादे हंगामी सरकार येईल; पण त्यातून सामाजिक परिवर्तन घडणार नाही.

भारताला आज क्रांतीसाठी काम करणारा व सत्ता ही सेवाबुद्धीने वापरणारा पक्ष हवा आहे. लोकशाहीमध्ये विकास कार्यक्रमांत लोकांना कामाला लावणारे सेवाव्रती कार्यकर्त्यांचे दल अत्यंत अवश्यक असते. आजचे राजकारण केवळ संसदीय डावपेचाचे, निवडणुकी लढविण्याचे व दुसऱ्यांच्या पक्षात फट पाडण्याचे आहे. त्याचा जनतेशी संपर्क उरलेला नाही. जोपर्यंत अशी पक्ष संघटना तयार होत नाही तोपर्यंत केवळ वटहुकूम काढून किंवा मोर्चे काढून प्रश्न सुटणार नाहीत. या देशातील भूहीन शेतकऱ्यांची संघटना करणारे, कामगारांची उत्पादन क्षमता वाढविणारे, समाजाला डोळस करणारे, बुद्धिवंतांना जवळ करणारे राजकारण आज हवे आहे. जनसंघ, डावे कम्युनिस्ट सोडले तर असे कार्यकर्त्यांचे दल कोणाजवळही नाही. त्यांचे नेतृत्वही केवळ खुर्ची टिकविण्याचे (Politics of survival) राजकारण करीत आहे. म्हणून या देशाची आजची गरज अशा एक-दोन समर्थ लोकपक्षांची बांधणी ही आहे. तिला वेळ लागेल. आणखी दोन निवडणुकीनंतर जनसंघ प्रभावी होईल. डाव्या कम्युनिस्टांनाही आपले धोरण बदलावे लागेल किंवा नामशेष व्हावे लागले. व्हिएटनाप्रमाणे आपली पक्षसंघटना राष्ट्रवादी करण्याचा त्यांच्या नेत्यांचा विचार आहे असे ऐकले आहे. निवडणूक ही एक

वैचारिक मंथनाची, राजकीय परिवर्तनाची प्रक्रिया आहे. त्या अर्थाने ती सामाजिक प्रक्रियाही आहे. लोकसभेच्या या आगामी निवडणुकीत ही प्रक्रिया जोराने चालू होईल. केवळ वैचारिक ध्रुवीकरण किंवा पुर्नघटन ही आजची गरज नाही. गरज आहे नवा समर्थ लोकपक्ष, बांधण्याची. 'तुझा तू वाढवी राजा' हे जसे समर्थांनी त्याकाळी म्हटले; तसे लोकांना या देशांत क्रांति व्हावीशी वाटत असेल तर त्यांचा पक्ष त्यांनी निर्माण केला पाहिजे. ब्रिटनमधील लोकशाही पक्षांचा जन्म हा त्यांच्या राजांशी झालेल्या संघर्षातून झाला. भारतात जो संघर्ष आहे तो या देशाच्या पलायनवादाशी, विभूतिभूजेशी, गटबाजीशी, जातिवादाशी ! लोककारण करणारा पक्ष लोकोपयोगी राजकारण करू शकेल; पैसा, जात, धर्म किंवा वैयक्तिक हुकूमशाही यांच्या आधारे राजकारण करणारे पक्ष नाहीसे झाले पाहिजेत. ते काम मतदारांचे आहे. या लोकसभेच्या निवडणुकीत जसे राष्ट्रीय राजकारण चर्चिले जाईल, तसेच राष्ट्रीय राजकीय पक्षही त्यांतूनच उदयास आले पाहिजेत. लोकशाहीच्या शुद्धीकरणाची व तिच्या पक्षीय पुनर्रचनेची ही संधी आहे.

— परवा निवडणूक प्रमुख श्री. सेनवर्मा यांनी सांगितल्याप्रमाणे "या निवडणुकी वादळी ठरतील. पक्षांतर व गटबाजी थांबविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे वारंवार मध्यावधी निवडणुकी घेणे." त्याने राजकीय शक्तीचे व्यवहार्य व हितप्रद पुनर्घटन होईल. सत्तेची मक्तेदारी हीही आर्थिक मक्तेदारीइतकी घातक असते. तीच लोकशाही भ्रष्ट करते. भ्रष्ट लोकशाही ही हुकूमशाहीकडेच लोकांना नेते. म्हणून सत्तेची मक्तेदारी नाहीशी झाली पाहिजे. हा तडाखा ह्या मध्यावधी निवडणुकी देतील.

निवडणूक मतप्रवाह :

# कमी मतांनी काँग्रेसने जिंकलेल्या जागा

वा. दा. रानडे

लोकसभा निवडणुकीत यावेळी खरी चुरशीची लढत होणार आहे ती काँग्रेसने गेल्यावेळी अगदी थोड्या मतांनी जिंकलेल्या जागांसाठी. या जागा सत्तारूढ काँग्रेसने यावेळी गमावल्या तर तिला हुकमी बहुमत मिळणे कठीण जाईल. गेल्या निवडणुकीतील अशा जागांच्या निकालांचा या दृष्टीने अभ्यास करणे उद्बोधक होईल.

लोकसभेच्या १९६७ च्या निवडणुकीत एकूण ५२० जागांपैकी फक्त २०६ जागा उमेदवारांनी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवून जिंकल्या. यापैकी फक्त ९२ जागा काँग्रेसला व बाकी विरोधी पक्षांना मिळाल्या. विरोधी पक्षांना मिळालेल्या जागांची विभागणी पुढीलप्रमाणे: द्रवीड मुन्नेत्र कळघम २४, स्वतंत्रपक्ष २३, मार्क्सवादी १२, उजवे कम्युनिस्ट ५, संयुक्त समाजवादी ८, प्रजासमाजवादी ५, बंगला काँग्रेस ५, पुरोगामी गट २, शे. का. पक्ष २, मुस्लीम लीग २, अकाली दल फत्तेसिंग गट १, डोंगरी नेते परिषद १. लोकसभेत द्रवीड मुन्नेत्र कळघमने एकूण २५ जागा जिंकल्या. त्यापैकी २४ पन्नास टक्क्यापेक्षा अधिक मते मिळवून जिंकल्या आहेत. म्हणजे त्या मतदार संघात इतर सर्व पक्षांपेक्षा द्र. मु. क ला अधिक पाठिंबा होता हे उघड आहे. अर्थात द्र. मु. क. च्या नेतृत्वाखालील आघाडीत सामील असलेल्या पक्षांचा त्या पक्षाला पाठिंबा होता व द्र. मु. क ला मिळालेली मते केवळ त्या पक्षाची नाहीत हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. द्र. मु. क. आघाडीमधून स्वतंत्र पक्ष, व मार्क्सवादी यावेळी बाहेर पडले आहेत. पण सत्तारूढ काँग्रेस त्यात सामील झाली आहे. तरीही द्र. मु. क ची घसरलेली लोकप्रियता लक्षात घेता यावेळी द्र. मु. क. ला पूर्वी इतक्या जागा मिळविणे कठीण जाईल.

काँग्रेसने ५० टक्क्यापेक्षा अधिक मतांनी जिंकलेल्या ९२ जागांपैकी सर्वात जास्त २० जागा महाराष्ट्रात जिंकल्या. इतर राज्यातील विभागणी पुढीलप्रमणे : आंध्र

१५, आसाम ४, बिहार २, गुजरात ७, हरियाना ५, काश्मीर २, केरळ ०, मध्य-प्रदेश ८, तामिळनाडू १, म्हैसूर ११, ओरिसा २, पंजाब १, राजस्थान ४, उत्तर-प्रदेश १, पश्चिम बंगाल १, केंद्र प्रदेश ८, काँग्रेसच्या दृष्टीने या ९२ जागा जवळ-जवळ सुरक्षित आहेत असे म्हणायला हरकत नाही. काँग्रेसमधल्या फुटीमुळेच यात फरक पडेल. अविभक्त काँग्रेसने गेल्यावेळी गुजरातेत जिंकलेल्या ७ व म्हैसूरमध्ये जिंकलेल्या ११ जागा यावेळी सिंडिकेट काँग्रेसला मिळण्याचा संभव आहे.

महाराष्ट्रात नाशिक, मालेगाव (आदिवासी) नंदुरबाद (आदिवासी) धुळे, बुलढाणा, खामगाव (हरिजन), अकोला, रामटेक, चांदा, नांदेड, लातूर (हरिजन), औरंगाबाद, उस्मानाबाद, पंढरपूर, नगर, खेड, बारामती, सातारा, कऱ्हाड, सांगली, कोल्हापूर या २० जागा काँग्रेसने ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवून गेल्यावेळी जिंकल्या. त्या पुन: जिंकणे इंदिरा काँग्रेसला सोपे जाईल.

महाराष्ट्रातील फक्त ५ जागा विरोधी पक्षांनी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवन जिंकल्या. त्यापैकी कुलाबा व हातकणगले या दोन जागा शे. का. पक्षाने, पुण्याची जागा संयुक्त समाजवादी पक्षाने, राजापूरची प्रजासमाजवादी पक्षाने आणि रामटेकची अपक्ष उमेदवाराने जिंकली. यापैकी हातकणगलेची जागा कोल्हापूरच्या राजमाता विजयमाला राणीसाहेब यांनी मुख्यत: राजघराण्याच्या वजनावर व दत्तक प्रश्नावरच्या असंतोषामुळे जिंकली व पुण्याची जागा एस. एम. जोशी यांनी आपल्या वैयक्तिक व्यक्तिमत्वामुळे जिंकली. समितीतर्फे या जागा लढविल्या गेल्या होत्या. त्यांच्या यशात समितीच्या घटक पक्षांचाही वाटा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. यावेळी तशी परिस्थिती नसल्याने या जागा जिंकणे विरोधी पक्षास अवघड जाईल. राजापूरची जागाही नाथ पै नी स्वत:च्या वैयक्तिक कार्याच्या व व्यक्तिमत्वाच्या जोरावर मुख्यत: जिंकली. त्यांच्या निधनाने त्या तोडीचा उमेदवार मिळणे व जागा जिंकणे प्रजासमाजवादी पक्षाला कठीण जाईल.

महाराष्ट्रातील १७ जागा काँग्रसने गेल्यावेळी ५० टक्केपेक्षा कमी मतांनी जिंकल्या. या जागा पुढीलप्रमाणे : रत्नागिरी, मुंबई मध्य, मुंबई वायव्य, मुंबई ईशान्य, भिवंडी, डहाणू (आदिवासी), जळगाव, अमरावती, नागपूर, भंडारा, चिमूर, वर्धा, यवतमाळ, परभणी, जालना, सोलापूर व कोपरगाव. या जागासाठी सरळ दुरंगी सामने झाले असते तर विरोधी पक्षांची मते विभागली न जाता त्यांनी या जागा जिंकल्या असत्या. या जागांवर विरोधी पक्षांनी आपले बळ एकवटले व इंदिरा काँग्रेशी सरळ सामने दिले तर, त्यापैकी काही त्यांना मिळण्याचा संभव आहे.

या १९ मतदारसंघात काँग्रेसला शेकडा मते पुढीलप्रमाणे मिळाली. रत्नागिरी ४३·७६, मुंबई मध्य ४५·४८, मुंबई वायव्य ३१·६५, मुंबई ईशान्य ४०·३४, भिवडी ४३.४५, डहाणू (आदिवासी) ४७·४६, जळगाव ४२.८९, अमरावती

४७·६५, नागपूर ३६·५६, भंडारा ४४·४१, चिमूर ३९·५२ वर्धा ४०·३९, यवतमाळ ४७·६१, परभणी ४८·१३, जालना ४८·३३, सोलापूर ४३·०३, कोपरगाव ४६·२७. सर्वात कमी ३१·६५ टक्के मते कॉंग्रेसला मुंबई वायव्य मतदारसंघात मिळाली. तेथे कॉंग्रेसचे शांतिलाल शहा प्रतिस्पर्धी उमेदवार समिती पुरस्कृत एच्. आर. गोखले यांच्यापेक्षा फक्त १३६४ जास्त मते मिळवून निवडून आले. येथे नऊ उमेदवारांमध्ये सामना होता. मुंबई मध्य जागेची भंडारे–अत्रे निवडणूकही अत्यंत चुरशीची झाली. भंडारे फक्त ६९५२ मते अधिक पडून विजयी झाले. नागपूरला कॉंग्रेस उमेदवार फक्त ३६·५६ टक्के मतें मिळवून विजयी झाला. तेथे सात उमेदवारात सामना होता. सरळ सामने झाले तर विरोधी पक्ष अधिक जागा जिंकील, पण ती शक्यता थोडी आहे. विरोधी पक्षांची एक आघाडी होणे शक्य नाही. सिंडिकेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीत डाव्या गटांपैकी फक्त संयुक्त-समाजवादी पक्ष स्थापन झाला आहे. शे. का. पक्ष, कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी या डाव्या पक्षांचा वरील आघाडीस विरोध असून ते आघाडीचे उमेदवाराविरुद्ध उमेदवार उभे करतीलच. याशिवाय काही अपक्ष उमेदवारही उभे रहाण्याचा संभव आहे. याप्रमाणे एकेका जागेसाठी अनेक उमेदवार उभे राहिल्याचा त्याचा फायदा इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसला मिळेल व कमी मते मिळूनही त्यांचे उमेदवार निवडून येतील.

महाराष्ट्रात ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळून विजयी झालेले विरोधी पक्षाचे फक्त दोनच उमेदवार होते. त्यापैकी एक संयुक्त समाजवादी पक्षाचा व दुसरा कम्युनिस्ट पक्षाचा होता. या दोन्ही जागा मुंबईतील असून पहिली जॉर्ज फर्नांडिस यांची व दुसरी डांगे यांची होती.

महाराष्ट्राशिवाय इतर राज्यात ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळून विजयी झालेल्या कॉंग्रेस उमेदवारांची संख्या १९६७ मध्ये पुढीलप्रमाणे होती. आंध्र १९, आसाम ५, बिहार ३३, गुजरात ४, हरियाना २, काश्मीर १, मध्यप्रदेश १७, तामिळनाडू २, म्हैसूर ७, ओरिसा ५, पंजाब ८, राजस्थान ६, उत्तरप्रदेश ४३ व पश्चिम बंगाल १३. या जागांवर विरोधी पक्षांनी आपली शक्ति एकवटली तर त्यापैकी काही जागा तरी त्यांना निश्चित मिळतील. पण महाराष्ट्राबद्दल मी लिहिले तेच सर्वसाधारणपणे इतर राज्यांबद्दलही म्हणता येईल. इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध सर्व विरोधी पक्षांची एक आघाडी होण्याचा संभव दिसत नाही. डावे पक्ष तर यावेळी पूर्वीपेक्षाही अधिक विस्कळीत आहेत. उजवे गट अधिक संघटित असल्याने ते थोड्या अधिक जागा मिळवितील. पण हुकमी बहुमत विरोधी आघाडीलाही मिळण्याची शक्यता नाही व इंदिरा कॉंग्रेसलाही मिळण्याची शक्यता कमी आहे.

☐ ☐ ☐

# आंदोलन करा....

धरणे, सत्याग्रह, निदर्शने, घेराव, मोर्चा, मिरवणुका हे सारे मार्ग सत्याचे. तेच चोखाळा आणि आपली सारी शक्ती पणाला लावून एकेका मार्गाचा अवलंब करीत सुटा. प्रथम अहिंसक पद्धतीने. पण हळूहळू हिंसक कृती कराव्या लागल्या तर मुळीच मागेपुढे पाहू नका.

गोमंतकातील माध्यमिक शिक्षकांनी हा मार्ग अनुसरला आणि त्यांचे भले झाले. त्यांची मागणी साधीच होती. १९६७ साली केन्द्र सरकारने जाहीर केलेली शिक्षकांसाठी सुधारित वेतनश्रेणी आम्हालाही द्या; नोकरीत संरक्षण द्या! त्यासाठी आवश्यक तर जुन्या अनुदानसंहितेतील काही कलमे बदलून टाका. इतर संघ-प्रदेशांना लागू करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी आम्हाला का मिळू नये हा त्यांचा सवाल.

गेली सुमारे तीन वर्षे भावी पीढीचा हा प्रणेता भांडत होता. सभा, संमेलने, ठराव, पत्रके असे लोकशाही मार्ग अनुसरत होता. सरकारला सांगत होता की आमची न्याय मागणी पुरी करा. तोपर्यंत १९६७ साली केंद्राने दुसरी सुधारित वेतनश्रेणी जाहीर केली. ज्या महाराष्ट्र-राज्याच्या अनुदान-संहितेची नक्कल गोवा शासनाने केली होती. तेथेच त्या संहितेची तीन वेळा उलथापालथ झाली. शिक्षकांच्या हिशेबी मागण्या मंजूर करणारे अनेक बदल तेथे केले गेले. परंतु गोवा सरकार मात्र झोपले होते डाराडूर! मुलाखतीला गेलेल्या शिक्षकांना ठरीव साच्याचे एकमेव उत्तर देण्यात येत होते.

"आमचा हा संघप्रदेश असल्याकारणाने आम्ही तुमची मागणी केंद्राकडे पाठविली आहे. ती अद्यापि मंजूर झाली नाही. तुमच्या भावनांशी सरकार सहमत आहे. पण नाइलाज......! ती वेतनश्रेणी लागू करायची तर सहा लाख रुपये हवेत. पैसे आहेत. जमतील. पण केंद्रीय अर्थमंत्रालयाची मंजुरी.......!"

शिक्षकांचे म्हणणे. ठीक आहे प्रयत्न करा. पण अनुदान संहितेत इष्ट बदल करणे हे तरी तुमच्या अखत्यारीतले! ते करा. चालकांना सर्वाधिकार देणारे, शिक्षकांना कोणत्याही कारणाविना तडकाफडकी कामावरून दूर करणारे ७४ वे कलम बदला. काही सुधारणा करा. ते तर शासकीय कक्षेतले."

नवी संहिता कशी असावी याबद्दलची एक सूचनापुस्तिकाही शिक्षकसंघाने प्रसिद्ध केली. पण राज्ययंत्रणा शान्त होती. नियमावर बोट ठेवून, परिस्थितीचा हवाला देऊन असहायतेचे प्रदर्शन करीत होती. शिक्षकांच्या साऱ्या मागण्या तशाच धूळ खात पडल्या होत्या. कुठेच काही हालत नव्हते.

अखेर शिक्षकांनी लढ्याचे रणशिंग फुंकले. श्री. माधव पंडित व श्री. रवींद्र पै रायतुरकर ही शिक्षकांची नेतेमंडळी. त्यांनी कंबरा कसल्या. कृतिसमिती स्थापन झाली. सारे प्राथमिक, माध्यमिक शिक्षक एकत्र आले. सचिवालयासमोर 'धरणे' धरून बसण्याचा कार्यक्रम जाहीर झाला. आणि एवढा गदारोळ झाल्यानंतर सरकारी यंत्रणा थोडीफार हलू लागली.

शिक्षण-संचालकांनी दिल्लीच्या फोनला कान व तोंड लावून बैठक मारली. मुख्य सचीव दस्तुरखुद्द फाईल घेऊन दिल्लीत धावपळ करू लागले. राज्यमंत्री श्री. अच्युतराव उसगांवकर पत्रकार परिषद बोलावू लागले.

"भावी पीढी, देशाचे नागरिक, राष्ट्राचे आधारस्तंभ घडविण्याचे सामर्थ्य त्यांचे, त्यांना न्याय मिळावा या ईर्षेने, जिद्दीने प्रेरित होऊन सारे शासन कामाला लागले.

दरम्यान शिक्षक संघाच्या कृति-समितीने 'धरणा' कार्यक्रम पार पाडला. सचिवालयाच्या दारासमोर या वीसएक शिक्षकांनी बसकण मारली होती. घोषणा-फलक घेऊन राज्यमंत्र्यांनी त्यांना बोलावून घेतले. समजूत काढली. शिक्षक म्हणाले "आश्वासने द्या, काय वाटेल ते करा. सायंकाळी ५॥ वाजेपर्यंत 'धरणा' उठणार नाही.' दुपारी सुमारे दोनशे शिक्षक-शिक्षिकांनी शहरातून मिरवणूक काढली. जनतेचेही लक्ष या प्रश्नाकडे वेधून घेतले. असा सारा सोहळा झाला.

दिल्लीहून मंजुरी 'येणार, येणार' हा जप अधिकाऱ्यांनी सुरू केला. शिक्षकांनीही पुनश्च बैठक घेतली. लढा तीव्रतर करण्याचा निर्णय घेतला. तुताऱ्या गर्जू लागल्या.

सरकारने एक निर्णय जाहीर केला. 'अनुदान संहितेत सुधारणा बदल करण्याच्या दृष्टीने एक सेमिनार आयोजित करण्यात येत आहे. शिक्षक, पालक, विद्यार्थी, साऱ्या शैक्षणिक जीवनाचे प्रतिनिधी सेमिनारमध्ये भाग घेतील. बदल सुचवतील. सरकार त्याचा काळजीपूर्वक विचार करील, योग्य स्वीकृत केले जाईल।

शिक्षकांचा या एकाही गोष्टीवर विश्वास नव्हता. त्यांना प्रत्यक्ष कृति हवी होती.

अखेर सरकारी निर्णय मिळाला. दिल्लीहून तारेने मंजुरी आली. '६७ ची सुधारित श्रेणी शिक्षकांना द्या।

आणि दुसऱ्या ७० च्या सुधारित श्रेणीचे काय ? थांबा मिळेल ते पदरात पाडून घऊन पुढल्यासाठी भांडणे.

## प्रश्न पूर्ण भिजून आहे

मैलोगणती पाण्याचे जाळे पसरविणाऱ्या गोव्यातील नद्या, उपनद्या बऱ्याच वेळी, काठावरचे बांध फोडून शेतात घुसतात, आणि हजारो एकर भात शेतीच्या जमिनीची नासधूस करून जातात. 'खाजन' या जातीची ही शेती ! नद्यांचे खारे पाणी या शेतात शिरले की उभ्या शेताची डोळ्यादेखत दुर्दशा पहाण्याचा प्रसंग शेतकऱ्यावर येतो. सरकारने आपल्या परीने यावर उपाययोजना चालू ठेवली

असली तरी सरकारी अधिकाऱ्यांचा बिनडोकपणा आणि लाल फीत यामुळे थोड्या-फार प्रमाणात हे नुकसान सुरूच आहे.

यावर कायमची उपाययोजना करण्याची इच्छा सरकारला आहे. त्यासाठी एक 'बंड्स् कमिटी' ही नेमण्यात आली. पण असे म्हणतात की, या समितीने सरकारच्या तिजोरीलाच भगदाड पाडले आणि तो पैसा स्वतःच्या शेतात भरून घेतला. या समस्येवर तज्ञांनी विचारविनिमय करून काहीतरी कायम उपाययोजना करावी ही लोकांची मागणी ! पण...!

दरवर्षी अक्षरशः लाखो रुपयांचे बांध बांधले जातात आणि ते फुटतातही. कुणीतरी सांगितले की हे बांध मुद्दाम फोडले जातात. मासळी मारण्यासाठी ! पण मग शेतीचे काय ?

राम जाणे. मासळीही नाही. भातशेतीही नाही. ही आजची अवस्था !

हे बांध पूर्वी शेताचे मालक बांधायचे. त्यावर डोळ्यात तेल घालून त्याला अहोरात्र जपायचे. थोडेसेही पाणी पाझरू लागले तरी भगदाड मोठे होऊ नये यासाठी कसून प्रयत्न व्हायचे. पण कूळकायदा आला. शेतांची मालकी कुळांकडे आली. बांध फुटल्यानंतर दुरुस्तीसाठी लागणारे हजारो रुपये नसतात म्हणून आणि कष्ट न करता मिळते तर हातपाय का हलवा याही विचाराने जात्याच अल्पसंतुष्ट असलेला गोमंतकीय शेतकरी तिकडे दुर्लक्ष करू लागला. परिणामी काही जमीन तर आज गेली बरीच वर्षे पाण्याखाली आहे.

कायद्यात योग्य तरतुदी नाहीत. लाल फितीच्या सरकारला म्हणावी तशी आंच नाही. 'गोवा मुंडकार परिषद, शेतकरी पंचायत' नावानी वावरणाऱ्या तथाकथित शेतकरी संघटनांना सरकारवर टीका करण्याव्यतिरिक्त या प्रश्नात खास आस्था नाही. अशामुळे हा प्रश्न गेली दहा वर्षे पाण्यात भिजत पडला आहे. नव्हे पूर्ण पाण्यात बुडून गेला आहे.

गेल्याच आठवड्यात मार्शेल नजीकच्या 'सात ईरतेव्हा' या गावानजीकचा असाच एक प्रचंड बांध कोसळला आणि एकवार सगळीकडे चाळवाचाळव सुरू झाली. या छोट्यामोठ्या अनेक ठिकाणच्या भगदाडांनी नदीचे पाणी केवळ शेतातच घुसले असे नव्हे, तर सुमारे दोन हजार लोकवस्तीच्या गावात शिरले. आणि शेती दीर्घकाळपर्यंत पाण्याखाली राहिल्याने विषारी सर्प, उंदीर आणि डास यांची प्रचंड प्रमाणात उत्पत्ती झाली आहे. साथींच्या रोगांचा धोका आ वासून गावासमोर उभा आहे.

सरकारी अधिकारी, तज्ञ, जिल्हाधिकारी आणि राजकीय पक्षांचे पुढारी यांनी या परिस्थितीची पहाणी केली. आणि यावर तातडीने उपाययोजना व्हायला हवी असा निष्कर्ष काढला.

निष्कर्षच बर का ! उपाययोजना ? वेडे आहात. लाल फीत पुढेच आहे !

❑ ❑ ❑

# साहित्य सप्ताह

## अभिनव उपक्रम

प्रकाश जावडेकर

एखाद्या महाविद्यालयाचे साहित्य-चर्चा-मंडळ म्हटले म्हणजे काही ठराविक कार्यक्रम करणारे मंडळ असा अर्थ रूढ होऊ लागलाय. साहित्यविषयक काही निश्चित भरीव काम करून तरुण लेखकांना सार्थ प्रोत्साहन मिळावे ह्या उद्देशाने सारी साहित्यमंडळे आस्तित्वात आली. पण प्रत्यक्षात ह्या मंडळाचे काम मात्र 'आहे म्हणून चालते' अशा पद्धतीचे आहे. अर्थात ह्याला काही अपवाद जरूर आहेत. पण तरीसुद्धा सर्वसाधारण स्थिती हीच.

यंदा म. ए. सो. वाणिज्य महाविद्यालयाच्या साहित्य-चर्चा मंडळाने मात्र आघाडी मारली. त्यांनी एक अभिनव उपक्रम केला. 'साहित्य-सप्ताह' हे त्या कार्यक्रमाचे नाव. सतत आठ दिवस साहित्यातल्या एकेका प्रकारावर त्या त्या प्रकारातला सिद्धहस्त लेखक आपल्या कलाकृतीचा परिचय करून देत होता. आठही दिवस गर्दी जमत होती. तासभर व्याख्यान होत होते. नंतरही चर्चा रंगत होती. आणि अपूर्व समाधानात श्रोते बाहेर पडत होते. असे जागरण सतत आठ दिवस घडले आणि त्याचे श्रेय निश्चितच साहित्य चर्चामंडळाच्या पदाधिकाऱ्यांना आहे. वाणिज्य महाविद्यालयात साहित्य सप्ताह इतका यशस्वी होतो याचेच प्रत्येक लेखकाला आश्चर्य वाटले. स्वाभाविक आहे. इतर ठिकाणी केवळ दहा-बारा मंडळी जमतात. आणि ह्या महाविद्यालयात मात्र कोणाचाही कार्यक्रम असला तरी ७०-८० विद्यार्थी हजर असतात.

साहित्य साप्ताहाचे उद्‌घाटन प्रसिद्ध कादंबरीकार श्री. श्री. ज. जोशी यांनी केले. त्यांनी आपले भाषण नेहमीप्रमाणे रंगवले. ते म्हणाले, 'एखादा लेखनप्रकार एखाद्या कालात खूप फुलतो याचे कारण प्रत्येक लेखनप्रकाराचे युग असते. त्यात तो काळही त्या लेखनप्रकाराला अनुकूल असतो. दुसऱ्या महायुद्धानंतर कथांचा

काळ होता. त्या काळात मला प्रत्येक माणूस 'कथांचे झाड' वाटायचा. प्रत्येकाला एक गुरू भेटावा लागतो. मला प्रकाशकांनी आग्रह केला म्हणून मी कादंबरीकार झालो. काही सुचलं तरी मी लिहीत होतो. त्यातूनच मला कादंबरीची चतु:सूत्री मिळाली. कादंबरीमध्ये १. प्रभावी व्यक्तिचित्रण २. अनेक संसारांचे वर्णन. त्यात वैचित्र्य. ३. त्या काळाचे दर्शन ४. तत्वज्ञानाचा धागा ह्या गोष्टी आवश्यक आहेत. एक दृष्टिकोण निश्चित पाहिजे त्याशिवाय लिहू नये. कादंबरी काय किंवा कथा काय त्यात गोष्ट असावी, काही जीवन-दर्शन असावे अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.'

दुसऱ्या दिवशी गर्दी भरपूर होती. कारण वक्त्या होत्या श्रीमती संजीवनी मराठे. अनेकांना त्यांचं काव्य गायन ऐकायचे होते. संजीवनीबाईंनी काव्य गायनसुद्धा केले आणि आपल्या ओघवत्या शैलीत त्यांनी स्वतःच्या काव्याचा प्रवास सांगितला. त्यांनी त्यांच्या काव्यामागची पार्श्वभूमी सांगितली. त्यांनी सांगितले की, 'कविता म्हणजे गीत असावे. मधुर असावे, अंतर्याम मधूर व्हावे. माधुर्याची चव स्वतःला आणि इतरांना कळावी. गाऊन मन रिझवावे ही माझी सुरवातीच्या काळात कविते-संबंधी भूमिका होती. माझा सुरुवातीचा ओढा तांब्यांकडे होता. पण लवकरच मला माझे 'तंत्र' गवसले. वेगळेपण मिळाले. मग मी लिहित राहिले. सतत कविता करत होते. स्वयंपाक करतानासुद्धा बाजूला पाटया ठेवल्या आणि त्यावर सुचतील तेव्हा कविता करत होते. तो काळ काव्याने भरला होता. काव्य मला जगवत होते. कवीचा संसार हा अंतर्यामातून फुलत असतो. मला 'गूढा'ची आसक्ती सतत होती. जीवन प्रचिती काव्यात यावी हा प्रयत्न मी सतत केला. कवि आत्मविष्कारासाठी कविता करतो आणि मनात भावार्थाचे राऊळ उभे करतो.' अशा अनेक गोष्टी सांगून त्यांनी ठिकठिकाणी काव्यातली उदाहरणे दिली त्यामुळे भाषण खूपच रंगले.

तिसऱ्या दिवशी वि. ग. कानिटकर उर्फ रामशास्त्री होते. त्यांचा विषय होता 'माझे वाचन' सगळयात व्यवहारी आणि उपयुक्त भाषण झाले. त्यांनी सांगितले. की वाचनाने मनुष्य पूर्णत्वाला पोचतो. सध्या स्वातंत्र्य मिळाले आहे म्हणून हा काळ लेखनाला अनुकुल आहे. प्रतिभा फुलण्यासाठीसुद्धा वाचनाची फार मोठी मदत होते. कारण शेवटी प्रतिभा म्हणजे संपन्न व्यक्तित्वाचा रमणीय अविष्कार आहे. वाचा पण ते निवडक आणि प्रतिभेला आव्हान देणारे वाचा. ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ तर सतत वाचले पाहिजेत. जगातले सर्व सुंदर वाचण्याचा प्रयत्न करावा. त्यातूनच लेखन फुलते.' यानंतर त्यांनी माझी भस्मासुराचा उदयआस्त आणि इतर पुस्तकांची पार्श्वभूमी सांगितली. नंतर त्यांनी आवर्जून सांगितले की भाषांतर करतानासुद्धा प्रतिभा वापरा आणि ओळबद भाषांतराच्या मागे लागू नका.

श्री. व. पु. काळे ह्यांनी भाषण केलेच नाही. लागोपाठ तीन कथा सागितल्या. व. पु. काळे फार सुंदर कथा सांगतात, त्यामुळे श्रोते तल्लीन झाले होते. त्या कथा

च नावूनच ती कथा कशी निर्माण झाली कशी फुलवली हे श्रोत्यांना आपोआप कळते. अर्थात कशी जाता जाता त्यांनी काही गोष्टी सांगितल्या. जीवनाच्या प्रत्येक अंगातडो कावून पाहिले म्हणजे हळूहळू लेखनाच्या नकळत त्याची शैली तयार होते. कथेतसुद्धा एखादा दृष्टिकोण असेल तर ती कथा जास्त रंगते.

पाचव्या दिवशी प्रसिद्ध दिग्दर्शक श्री. भालबा केळकर यांनी भाषण केले भाषण फार सुंदर आणि मुद्देसूद झाले. आपल्या भाषणात त्यांनी साऱ्या मराठी नाटकांचा आढावा आणि स्वतःचे अतिशय बोलके अनुभव सांगितले. प्रथम त्यांनी सांगितले की, चांगले नाटक लोकप्रिय होईलच असे नाही आणि लोकप्रिय नाटक चांगले असेल असे मुळीच नाही. मग जर एखादे नाटक लोकप्रिय करायचे असेल तर सर्वसामान्य माणसाला काय आवडते याचा विचार करावा. प्रेक्षकाला भडकपणा आवडतो. पण शोकांतिका नको असते. शब्दांचे सामर्थ्य नाटयाला खूप वर चढवते. त्यासाठी लेखकाने खूप वेगळा प्रयत्न करायला हवा. त्यानंतर त्यांनी play & Drama यातला फरक सांगितला. खेळ आणि नाटक असा तो फरक आहे. सिनेमा म्हणजे कॅमेऱ्याच्यारूपाने प्रेक्षक नटांभोवती फिरत असतो तर नाटकात नट फिरत असतात हा फरक लक्षात घेतला पाहिजे. मग खरं नाटक हे 'उत्क्रांत', 'उत्स्फूर्त' असले पाहिजे. काहीतरी पाहिलेले कुठेतरी 'उमटले' पाहिजे. आणि पात्राप्रमाणे नाटक आपोआप तयार झाले पाहिजे. नाटककार मधे येता कामा नये. असे नाटक खरे नाटक असते. म्हणूनच नव्या लेखकांनी स्थानिक यशापेक्षा खऱ्या नाटकाचे आव्हान स्वीकारावे तर ते नाटककार होतील, नाहीतर ते खेळकरी ठरतील असे अतिशय मार्मिक उद्गार काढून भालबांनी भाषण संपवले.

श्री. भा. द. खेर यांचे 'माझी चरित्रात्मक कादंबरी' ह्या विषयावर भाषण झाले. त्यांनी सांगितले की, चरित्रात्मक कादंबरीकाराला चरित्रनायकाच्या वागण्याचा अर्थ काढणे आणि संवाद ह्याच गोष्टीत स्वातंत्र्य मिळते. त्याने ऐतिहासिक सत्य कधी टाळू नये. त्याच वेळी त्यांनी मोकळेपणाने सांगितले की, मी काहीतरी आदर्श देण्याचा प्रयत्न करतो म्हणून Glorify करणे ह्यात मला पाप वाटत नाही. त्यांनी याचे कारण सांगितले की, Paint me as I am हे सूत्र ते मानतात. भाषणात त्यांनी प्रत्यक्ष ताश्कंदच्या दोन प्रसंगाचे वर्णन केले आणि ते कादंबरीत कसे आले ते समजावून सांगितले.

सातव्या दिवशी श्री. आनंद यादव यांचे 'माझ्या ग्रामीण कथा' ह्या विषयावर सरळ आणि स्पष्ट भाषण झाले. त्यांनी सांगितले की, ग्रामीण कथेला एक चाकोरी येऊ लागली म्हणूनच मी कथा लिहायला लागलो. ग्रामीण कथा हा प्रकार वेगळा मानू नये. माझी भूमिका 'सौंदर्यवादी' लेखकाची आहे. लेखक अनुकरण करतो पण लवकरच त्याला त्याचे 'वेगळेपण' गवसले पाहिजे. कथानकावरून कथेचा फॉर्म ओळखता आला पाहिजे. त्यानुसार लेखकाने लिहिले पाहिजे. ह्याला सतत त्यांनी स्वतःच्या अनुभवांची जोड दिली.

शेवटच्या दिवशी प्रा. अनंत काणेकरांचे भाषण. काणेकरांचे भाषण नेहमीप्रमाणे अतिशय रंगले. नव्या वाङ्मय प्रकारात दुर्बोधता काही काळ येणे स्वाभाविक असते. साहित्यात trade secret काही नाही. ललित आणि ललितेतर साहित्य असले तरी नैसर्गिक प्रतिभा पाहिजेच. पण प्रतिभेचा थर्मामीटर नाही म्हणून प्रतिभा आहे समजून पुढे चला मग आत्मपरिक्षण करा. आत्मपरिक्षण ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. अभिरूची उच्च पातळीची करण्याचा प्रयत्न करावा. मानवाने जीवनसमृद्धीसाठी धडपडले पाहिजे. जीवनसमृद्धी ही आयुष्याची कसोटी आहे. प्रवासवर्णन हे व्यक्तित्वावर अवलंबून आहे. पण त्यातून Generalization काढू नये. आपल्या अनुभवाचा वेगळेपणा यायला हवा. अद्‌भुतरम्य लिहू नका, सरळ लिहा आणि विशेषणे आणि अतिशयोक्ती हे अलंकार आहेत हे विसरू नका. शेवटी महत्त्वाचे म्हणजे, लेखनाच्या शेवटी संपल्याचा जाणीव झाली पाहिजे" अशा अनेक गोष्टी रंगवून काणेकर दीड तास बोलले. आणि ह्या सप्ताहाचा समारोप झाला.

◻ ◻ ◻

---

## गुजरातचा गड गडगडतो आहे

पृष्ठ ११ वरून

लावून कमी करणार याची माझी खात्री होऊन चुकली आहे.

मोरारजींचो विनाशकाले विपरीत बुद्धी : अशी अवस्था तर होत नाही ना ?

त्यांचा मोराल हळूहळू खाली जात आहे असे वाटते. कारण आपला मतदारसंघ आपण बदलावा अशी कुजबूज त्यांच्या गोटात सुरू झाली आहे.

जनसंघास एकही सीट देणार नाही असे गुर्जर कॉंग्रेसने ठरविले असल्यामुळे जनसंघ कॉंग्रेस (ओ) वर नाराज आहे हे स्वाभाविक आहे.

स्वतंत्र पक्षाच्या मदतीने इंडिकेट हितेंद्रभाईंचे मंत्रीमंडळ आठ महिन्यांपूर्वी गडगडविणार होते हे गुर्जर कॉंग्रेसवाले विसरू शकत नाहीत.

एकंदरीत, युद्धाच्या दुंदुभी वाजू लागल्या आहेत. पण त्यात घुबडांचा घूत्कार व टिटवीचा अमंगल नादही स्पष्टपणे ऐकू येत आहे.

मुंबईतील जनतेप्रमाणे आमची गुर्जर जनता म्हणत आहे. ही मारामारी काही बरोबर नाही. आम्हाला कॉंग्रेस (आर) नको आहे पण ती आमच्या बोडक्यावर आदळणार असे दिसते आहे.'

आमचा 'डायलेमा' कॉंग्रेस ओ, जनसंघ, स्वतंत्र व एस. एस. पी. चे बुढ्ढे पुढारी ऐकण्याच्या मनःस्थितीत आहेत कोठे ?

त्यांना कुमारी सत्ता पाहिजे आहे.

नुसतेच 'फ्लर्टींग' करायला. ◻

## आमच जाहिरनामे

पृष्ठ ७ वरून

कार हे आवश्यक आहे. मग इच्छा असो नसो निवडणुका नाही म्हणून चालण्यासारखे नाही. निवडणुका होणार सरकार येणार, आमच्या काळात देशासाठी मरणे हे कर्तव्य नसून चांगल्याप्रकारे जगणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. निवडणुका होणार, सरकार येणार, मग ते कसे सरकार असावे ?

जगात समर्थ भारत उभारावयाचा असेल तर प्रथम येणाऱ्या सरकारने अणुबाँब बनविणे आवश्यक आहे. वापर करणे न करणे हा भाग दुसरा, जगात दुर्बलाची भाषा कोण समजणार, समर्थांची भाषाच सर्वांना समजते.

दुसरी गोष्ट म्हणजे बेकारी निवारण करणे. हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. अशाप्रकारे बेकारी राहिली तर देशाचा बंगाल होण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी युद्धपातळीवर हा प्रश्न हाताळला गेला पाहिजे. नुसत्या गप्पा मारून चालणार नाही.

सध्याच्या भरमसाठ पंचवार्षिक योजनांऐवजी श्रमप्रधान स्वदेशी योजनेचा स्वीकार केला पाहिजे व बेकारी जास्तीत जास्त कमी करणे.

तिसरी गोष्ट म्हणजे भ्रष्टाचार निर्मूलन. यासाठी एक कायदा केला पाहिजे व सर्व देशद्रोह्याना चौकात गोळ्या घातल्या गेल्या पाहिजेत. त्यात हयगय करता उपयोगी नाही. सर्व नागरिकास समान कायदा लागू करणे, कामाचा अधिकार घटनेने देणे, मतदानाचे वय २१ वर्षांचे घटवून १८ वर्षे करणे, धर्म निरपेक्षतेने राज्य करणे, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, निर्बंधासह मालमत्तेचा अधिकार, कामगारांना नफ्याचा योग्य वाटा देणे व स्वदेशांची संरक्षणव्यवस्था मजबत व सर्व राज्यात सर्व मंत्र्यांची मालमत्तेची चौकशी.


हे सर्व करताना राष्ट्रवाद प्रथम त्यानंतर समाजवाद, जनसंघाचा राष्ट्रवाद व संयुक्त समाजवाद्यांच्या समाजवादाची कोठेतरी सांगड घातली गेली पाहिजे.

## प्रथम सरकार बदला !

सौ. शीला शहा, मुंबई

मी एक सामान्य संसारी स्त्री आहे. पण मलाही मत द्यावयाचा अधिकार प्राप्त झाला आहे. माझ्यासारख्या लक्षावधी स्त्रिया मत देणार असतील. तेव्हा निवडणुकांबद्दलचे माझे मत प्रकट करणे मला माझे एक कर्तव्यच वाटते.

लहानपणापासून आमच्या कुटुंबातील आम्ही सर्वजण कट्टर गांधीभक्त. त्यामुळेच मते नेहमीच कॉंग्रेसला. पण आता जी कॉंग्रेस आहे तिला कॉंग्रेस म्हणण्याची लाज




*Stockists :*

**M/s. Prabhu Hosiery,** 106 Chakla Street, Bombay-3.
**M/s. K. T. Karnani,** Picket Road, Bombay-2.
**M/s. T. Kishinchand,** Silk Bazar, Bombay-2.
**M/s. Prakash Traders,** 99, Chakla Street, Bombay-3.

वाटते. सत्तेच्या अभिलाषेमुळे काँग्रेसची लेबल्स लावून आलेली सगळी भोंदू माणसं त्यात भरली आहेत. सत्तेपुढं देशहितसुद्धा ज्यांना फिक्कं वाटू लागलं.अशा पक्षाच्या सरकारला कदापिही मत देऊ नये अशा विचाराची मी आहे. प्रथम हे सरकार बदलले पाहिजे. त्याऐवजी आम्हाला राष्ट्रवादी पक्षाचे सरकार हवे आहे. २३ वर्षे काँग्रेसच्या कार्याची वाट पाहिली. किती सहनशील आम्ही भारतीय ? सहनशील म्हणायचे की अंधश्रद्ध की मेलेल्या मनाचे ? प्रिय नेहरूंचे सर्व अपराध पोटात घेतले, प्रियदर्शिनीचे रोजचे मायाचार पचवतोच आहोत. काय म्हणावे आमच्या मनाला ? अजूनही जर काँग्रेस निवडून आली तर मात्र मला खरेच वाटेल की भारतीय माणूस जागा नाही, – झोपलेला नाही – २३ वर्षांची का झोप असते ? अन् झोपलेला जागा करता येतो – तर मेलेला आहे. नुसता Zombie आहे. हे सरकार बदलल्याशिवाय प्रगतीची कल्पांतीही अपेक्षा करणे म्हणजे शुद्ध गाढव-पणाच होईल. २३ वर्षांच्या कालात ज्या सरकारच्या अधिपत्याखाली एखाद्या देशात अंधाधुंदी, भ्रष्टाचार, अनाचार उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात चालू आहे त्याच देशात, त्या सरकारकडून एकदम फेरपालटाची कशी अपेक्षा करावी. म्हणून मला वाटतं की कुठल्याही प्रकारे हे सरकार बदलले पाहिजे. आम्हाला पुरोगामी पक्ष नको, आम्हाला प्रतिगामी पक्ष चालेल, एखादा हिटलरसुद्धा आम्हाला चालेल. पण असला राष्ट्रीयत्व नसलेला नवकाँग्रेस नावाचा नादान पक्ष आम्हाला नको आहे. आम्हाला हवे आहे केवळ राष्ट्रीयत्व – राष्ट्रीयत्व. नवकाँग्रेसला उखडून टाकण्यासाठी जरूर बड्या आघाडीला मत द्यावयास पाहिजे. निदान एक प्रयत्न ज्यामुळे की भारतीय मन जीवंत तरी आहे हे समजून येईल. आणि हेही नसे थोडके.

◻ ◻ ◻


प्रसिद्ध झाले ! प्रसिद्ध झाले !! प्रसिद्ध झाले !!!

स्वतंत्र विचारांचे समाजवादी पाक्षिक

**रणांगण**

संपादक अनिल बर्वे

मूल्य चाळीस पैसे

या अंकात मिदनापूरचे हत्याकांड–अनिल बर्वे
जेथे कला विकली जात नाही–के. रा. अब्बास
अहो आश्चर्यम–भाई माधवराव बागल
याव्यतिरिक्त ग्रिनिच टाईम्स, तुका म्हणे ऐशा नरा.
आणि "घोटाळा" ही भावस्पर्शी लघुकथा.
आपली प्रत आजच नोंदवा.

१२९५, शुक्रवार पेठ, पुणे ३०




B.L.U No 1036/ 4-8-71

शुक्रवार ता. २९ पासून प्रारंभ।
अत्यंत लोकप्रिय कादंबरी '**कटी पतंग**' 'आराधना'चे निर्माते।
भावपूर्ण चित्ररूपाने रुपेरी पडद्यावर सादर करीत आहेत.




निर्माता दिग्दर्शक
**शक्ति सामंता**

संगीत
**राहुलदेव बर्मन**

कथा पटकथा
**गुलशन नंदा**

गीते
**आनंद बक्षी**

**भू. : आशा पारेख, राजेश खन्ना, प्रेम चोप्रा, बिंदू, सुलोचना, नसीर हुसेन, मदनपुरी, चंद्रशेखर, ज्यू. मेहमूद.**

**आगाऊ तिकिटविक्री सोमवारपासून**

| **रॉक्सी** | **कॅपिटॉल** | **गणेश** |
|---|---|---|
| ९ ते १ व ३ ते ७ | ९॥ ते १ व ३ ते ७ | ९॥ ते १२॥ व ४ ते ७ |
| **सूर्य** | **लोटस** | **रुपम** |
| १० ते १२ व ४ ते ७ | १० ते १ व ३ ते ७ | ४ ते ८ |

पॅराडाईज, नंदी (वांद्रा), मीलन (सांताक्रूझ), अंबर-संगम (अंधेरी), टोपीवाला (गोरेगाव), हंजर (जोगेश्वरी), जोहरा (मालाड), जया (बोरिवली), श्रेयस (घाटकोपर), कल्पना-आकाश (कुर्ला), नटराज (चेंबूर), जवाहर (मुलुंड), अशोक (ठाणे), कृष्ण (भांडूप), पूर्णिमा (कल्याण), सपना-प्रभात (उल्हासनगर). –कपूरचंद आणि कंपनी प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

प्रसिद्धी : २६ जानेवारी १९७१.

पूर्वग्राहकांनी आपल्या प्रती
२७ जानेवारीपासून कार्यालयातून
नेण्याची व्यवस्था करावी.
दुपारी २॥ ते ६

परगावच्या पूर्वग्राहकांच्या प्रती
३० जानेवारीपासून रवाना
करण्यास सुरुवात होईल.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.